परस्परं भावयन्तः
म प्र
मराठे प्रतिष्ठान, मुंबई यांचे मुखपत्र

# हितगुज

अंक १२७ ✿ संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृष्ठ १२०) ✿ सप्टेंबर २०२१
Website : www.marathepratishthan.org
(फक्त खाजगी वितरणासाठी)

## संपादकीय

***प्रिय कुलबांधवांना आणि भगिनींना***
***माझा स्नेहपूर्वक नमस्कार.***

कुलदेवतेच्या कृपेने आपण कोरोनासारख्या संकटावर मात केली आहे. निर्बंधही शिथिल झाले आहेत. कोरोनाबरोबरच्या लढाईत आपण विजय मिळवत असलो तरी आरोग्यसेवेतील उणिवा आणि दोष यात खूपच सुधारणा होणे आवश्यक आहे. सरकारी हॉस्पिटलांवर लोकांचा विश्वास राहिलेला नाही म्हणून खाजगी, मोठ-मोठ्या हॉस्पिटलांमध्ये रुग्ण जातात पण तिथेही हॉस्पिटल्सनी आणि डॉक्टरांनी चालवलेली लूट ही गंभीर गोष्ट आहे. औषधांचा काळाबाजार कोरोनाकाळात लोकांनी चांगलाच अनुभवला. तेव्हा आरोग्यसेवा ही चांगली दर्जेदार असणे आवश्यक ठरते.

स्वातंत्र्याचं यंदा अमृतमहोत्सवी वर्ष खूप महत्त्वाचं आहे. दि. १५ ऑगस्टला आपण स्वातंत्र्यदिन साजरा करत होतो त्याचवेळी तालिबान्यांनी दहशतीने अफगाणिस्तान-काबूल प्रांतावर कब्जा मिळविला. आगगाडीच्या (ट्रेनमधून) डब्यात गर्दीतून लोंबकळणारी माणसे खाली पडून अपघाती मृत्यू पावतात त्याप्रमाणे विमानाच्या पंख्यावरून लटकलेली माणसे खाली पडून मरताना पाहून मनात कालवाकालव होते. दूरदर्शनवरील ही दृश्ये पाहून तालिबान्यांची भीषणता, दहशत, अत्याचार याची किती धास्ती आहे. जीव अक्षरशः मुठीत घेऊन लोक देश सोडून विमानात गर्दी करताहेत.

आपल्याही परराष्ट्र मंत्रालयाने अफगाणिस्तानातील, काबूलमधील हिंदू व शीख नागरिकांना सुखरूप मायदेशी भारतात परत आणण्यात यश मिळविले आहे. असो.

कोकणात पूरग्रस्तांचे हालही आपण पाहिले. असो.

अशा कठीण प्रसंगांतून आपण आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करीत आहोत. 'हितगुज'चा डिजिटल अंक वाचत असाल तेव्हा घराघरात सुखकर्त्या, विघ्नहर्त्या श्रीगणेशाचे आगमन झालेले असेल. पवित्र, मंगल, आनंददायी वातावरणात शरीर व मनही प्रसन्न होते. सर्वांना चांगली बुद्धी दे, आरोग्य दे, सर्वांना सुखात ठेव अशी श्रीगणेशाच्या चरणी प्रार्थना करू या.

आपली शुभचिंतक
**डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे**, (पृ. १२०),
(दि. २० ऑगस्ट २०२१)
भ्रमणध्वनी : ९८२०२३२०८२

**मराठे परीवारातील प्रत्येकाने आपल्या कुटुंबातील जन्म, मृत्यु, उपनयन, शैक्षणिक प्रगती व विवाह, इत्यादी घटना वेळेत आम्हाला कळवा म्हणजे नोंद घेतली जाईल. तसेच आपण जर आपले घर बदलले तर नवीन पत्यासह तपशील लगेच कळवावे.**

संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई - ४०००३१
दूरध्वनी : ०२२-२४१५०८८९ • इ-मेल : parbhakar.marathe@gmail.com
मुद्रक : इंडिया प्रिंटिंग वर्क्स, वडाळा, मुंबई - ४०००३१

# गणेशोत्सव सजावट स्पर्धा २०२१

आपल्या मराठे प्रतिष्ठानतर्फे सदस्यांसाठी तसेच चित्पावन कपिगोत्री ब्राह्मण असलेल्या मराठे, खांबेटे, चक्रदेव, विद्वांस आणि तद्जन्य आडनावाच्या व्यक्तींसाठी **‘घरगुती गणेशोत्सव सजावट स्पर्धा’** आयोजित केलेली आहे. आपल्या स्वतःच्या घरातील गणपतींसाठी केलेल्या सजावटीची कमाल दोन छायाचित्रे आपण प्रतिष्ठानकडे पाठवून आपण या स्पर्धेत भाग घेऊ शकता. याबाबतचे नियम व अटी पुढीलप्रमाणे:

- **स्पर्धेसाठी नोंदणी :** स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या व्यक्तींनी दि. 9 सप्टेंबर 2021 पर्यंत 9220699957 या क्रमांकावर SMS करून आपले नाव व राहण्याचे ठिकाण याची नोंदणी करावी.
- **भाग घेण्यासाठी पात्रता :** ‘मराठे परिवार’ या facebook group वरील सदस्य, मराठे प्रतिष्ठानचे/हितगुजचे सदस्य, मराठ्यांच्या माहेरवाशिणींच्या कुटुंबातील सदस्य, इतर सर्व कपिगोत्री मराठे कुलबांधव.
- **प्रवेशिका कुठे/कशा पाठवाव्या :** ‘मराठे परिवार’ या facebook group वर upload किंवा admin@marathepratishthan.org या इ-मेल आयडीवर केवळ '.jpg' format मधील कमाल 2 फाइलद्वारे.
- **प्रवेशिका पाठविण्याचा कालावधी :** दि. 10 सप्टेंबर 2021 ते दि. 30 सप्टेंबर 2021.
- प्रवेशिका म्हणून पाठवलेली छायाचित्रे प्रेषकाच्या घरच्या गणपतीच्या सजावटीची असावीत, बिल्डिंग/सोसायटी किंवा आळीतील किंवा इतर सार्वजनिक ठिकाणच्या गणपतीच्या सजावटीची नव्हेत. माहेरवाशिणी आपल्या माहेरच्या गणपतीच्या सजावटीची छायाचित्रे पाठवू शकतील.
- छायाचित्रे GPS Enabled असावीत. म्हणजे फोटो काढल्याचे ठिकाण कळू शकेल.
- प्राप्त झालेल्या प्रत्येक छायाचित्रास एक क्रमांक (आयडी) देण्यात येईल व तो प्रेषकाला कळवला जाईल. त्यासंबंधी असलेल्या विचारणा (enquiry) त्या क्रमांकाचा दाखला देऊन कराव्या.
- या स्पर्धेच्या बाबतीत अंतिम निर्णय परीक्षकांचा असेल. त्यासंबंधी कोणत्याही प्रकारची तक्रार/वादविवाद होऊ नयेत एवढीच माफक अपेक्षा आहे.

| या स्पर्धेतील यशस्वी स्पर्धकांना देण्यात येणारी पारितोषिके: | | |
|---|---|---|
| प्रथम पारितोषिक : रु.1001/- | द्वितीय पारितोषिक : रु. 751/- | तृतीय पारितोषिक : रु. 501/- |
| 20 पेक्षा जास्त प्रवेशिका आल्यास 2 उत्तेजनार्थ बक्षिसेही देण्यात येतील. | | |

**टीप:**

1. मराठे प्रतिष्ठानच्या **‘कार्यकारिणी सदस्यांना’** या स्पर्धेत भाग घेता येणार नाही.
2. पारितोषिक विजेत्यांची निवड, **किमान त्रिसदस्यीय** मंडळ करेल, ज्यात फोटोग्राफी/कला/ सजावट क्षेत्रातील जाणकार दोन/तीन सभासद सदस्य तसेच एक बाह्य परीक्षक असतील.
3. या स्पर्धेसंदर्भात काही शंका किंवा सूचना असल्यास कार्यवाह श्री. हेमंत मराठे यांच्याशी संपर्क साधावा.
4. कमीतकमी 7 प्रवेशिका आल्या तरच स्पर्धा घेण्यात येईल, अन्यथा स्पर्धा रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी. ई-मेल: hemant.a.marathe@gmail.com, भ्रमणध्वनी: ९२२०६९९९५७

# संवाद कुलबांधवांशी

•श्री. हेमंत अरुण मराठे (पृ. २१), नालासोपारा भ्रमणध्वनी : ९८२२८४७१२० / ९२२०६९९९५७

**न**मस्कार कुलबांधव आणि भगिनींनो,

आपल्या 'हितगुज'च्या सप्टेंबरच्या अंकामध्ये आपले स्वागत आहे. बघता बघता 'ई' स्वरुपातील हितगुज सुरू होऊन वर्ष उलटून गेले मात्र आपल्यावरील निर्बंध काही कमी होत नाहीत. संकट कमी अधिक होत आहे. मात्र या अभूतपूर्व संकटाला आपण सर्वजण धीराने तोंड देत मार्गक्रमणा करत इथपर्यंत आलो आहोत व पुढे चाललो आहोत. यालाच जीवन म्हणतात.

मंडळी गेले काही अंकामध्ये मी आपणांस आवाहन करत आहे की आपण आपल्या क्षेत्रावर लिखाण करा. त्यायोगे इतरांना विविध क्षेत्रांची माहिती मिळेल. मी स्वतः काहींना संपर्क करून लिहायला उद्युक्त करतो आहे व त्यामुळे मागच्या अंकात याची झलक दिसली आहे.

या अंकामध्ये डॉ. गिरीश जाखोटिया यांचा सद्यस्थितीला अनुसरून अर्थव्यवस्थेला सावरायचय? तर या १० गोष्टी कराव्या लागतील, हा अतिशय उपयुक्त लेख समाविष्ट केला आहे. याचबरोबर त्यांचे नुकत्याच प्रकाशित झालेल्या पुस्तकाची झलक छापली आहे. श्री. परिमल मराठे हे स्थापत्य अभियंता आहेत व नवीनतम बांधकाम तंत्रज्ञान जे विकसित होत आहे त्यावर उत्तम लेख इंग्रजी मधून छापला आहे. नवीन पिढी जोडली जावी हा उद्देश. श्री पुष्कराज मराठे हे विविध उपक्रम मुलांसाठी तसेच युवा पिढीसाठी राबवत असतात. त्याच संबंधीत लेख या अंकात छापला आहे. तसेच संस्कृत शिकण्यासाठी संधी उपलब्ध आहे त्याची माहिती दिली आहे.

गेल्या काही अंकापासून राधा मराठे यांच्या कथा आपण छापत आहोत. याही वेळी कमी वेळामधे अतीशय उत्तम अशी व्रतस्थ ही कथा त्यांनी पाठवली ती छापली आहे. स्त्री ज्यावेळी कणखरपणा दाखवते तेव्हा तिची जीतच होते हे या कथेमध्ये उत्तमरीत्या मांडलं आहे.

आपल्या परिवारामध्ये असे विविध क्षेत्रांमध्ये कार्य करणारे नामवंत आहेत त्यांनी लिहिते होणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत सोशल मीडिया खूपच कार्यरत असल्याने खूपदा चुकीच्या गोष्टी तसेच चुकीची माहीती लोकांपर्यंत पोहोचत असल्याने लोक चुकीच्या गोष्टी खऱ्या मानून चालतात. हे असे चुकीचे ज्ञान मिळणे धोक्याचे आहे म्हणून योग्य व्यक्तींनी लिहिते झाल्याने यापासून आपण लोकांना दूर ठेवू शकतो. मला असे वाटते की सध्या नोकरी धंद्यामधे व्यग्र असणाऱ्यांना हे शक्य होणार नाही परंतु जे आपल्या क्षेत्रातून निवृत्त झालेले आहेत त्या महिला व पुरुष वर्गाने आता लिहिते व्हायला काय हरकत आहे? तेव्हा तुम्ही अवश्य लिहा, आम्ही ते छापू व सर्वांपर्यंत पोहोचवू.

मंडळी, या महामारीतून आता आपण बाहेर पडतो आहोत. तेव्हा आता मोठे संमेलन नाही पण विभागातील लोकांनी एकत्र यायला सुरुवात करायला हरकत नसावी. तेव्हा आपापल्या विभागात राहणाऱ्या परीवारातील लोकांना भेटा, छोटे छोटे कार्यक्रम करा व आम्हाला कळवा म्हणजे 'हितगुज'मधे प्रसिद्ध देखील करता येईल.

आपणास आम्ही वारंवार आवाहन करत आहोत की आपण आपले ई-मेल आयडी, मोबाइल क्रमांक व पत्ता आम्हाला पाठवा, म्हणजे नोंद ठेवणे सोपे जाईल.

प्रतीवर्षी प्रमाणे याही वेळी श्री गणेश सजावट स्पर्धा घेण्यात येईल. मात्र नियमावली थोडी बदलली आहे. कारण प्रवेशिका कमी येत आहेत. १) जो या स्पर्धेमध्ये सहभागी होऊ इच्छित आहे त्यांनी दि. ९ सप्टेंबर २०२१ पर्यंत आपली नावे ९२२०६९९९५७ या क्रमांकावर sms करून पाठवावी. या तारखे नंतर आलेली नावे विचारात घेतली जाणार नाहीत. २) गणपती उत्सव सुरू झाल्यानंतर संपेपर्यंत म्हणजे दि १० सप्टेंबर ते २१ सप्टेंबर २०२१ या कालावधीत संस्थेच्या ई-मेल वर सजावटीचे प्रकाशचित्र (फोटो) पाठवावेत. सदर फोटो हे GPS ENBLED असावेत. म्हणजे आपले फोटो काढल्याचे ठिकाण कळू शकेल. फोटो पुढील संकेतस्थळावर पाठवावेत.

admin@marathepratishthan.org

आपणा सर्वांना श्री गणेश उत्सवाच्या तसेच पुढील महिन्यात येणा-या विजयादशमी व दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा.

♦

*काय करून झालं याचा मी कधीच विचार करत नाही;*
*काय करणं बाकी आहे याचाच मी नेहमी विचार करतो.*

**– गौतम बुद्ध**

# ज. गो. मराठे

• गीता मराठे-पुराणिक (पृ. ४०५), सांगली भ्रमणध्वनी : ९६२३४२५६४४

**बा**बा तुम्हाला माहीत आहे, तुमच्या मंडळात आम्हाला कोणतं धन मिळायचे ते? जे आयुष्यभर पुरत आहे... परवचा, म्हणी, वाक्प्रचार, जोडशब्द, समान आणि विरुद्ध अर्थाचे तोलमोलासह वाक्यरचना; लखलखीत रत्नासारखे उंची



श्लोक, गीतेबरोबरच अन्य स्तोत्र व यातून वाणीच्या व्यायामाचं महत्त्व, ताठ बसण्याबरोबरच सुंदर हस्ताक्षरासाठी खास प्रयत्न, मूर्तीकाम, रंगकाम, भाषणासाठी संवाद पाठांतर, भजनाबरोबर पेटीच्या संगीताची गोडी. खाडीवरच्या लाटा खडकावर आपटतानासुद्धा खणखणीत आवाजात तुमच्या तोंडून ऐकलेल्या बोधकथा, दिवाळीत पायलीच्या कंदिलाची केलेली प्रात्यक्षिके, प्रवचनातील प्रबोधन, उत्तमोत्तम कवींच्या कविता त्यातील भरजरी अलंकार, उपमा; तीर्थस्वरूप धर्मभास्कर कोपरकर बुवांच्या दासनवमीच्या कीर्तनातील लळीत, तीर्थस्वरूप शेवडेबुवा, हाटेबुवा, अभ्यंकर गुरुजी यांचे दर्शन व प्रवचनांचा योग. तुमच्यासोबत आम्ही सर्वांनी मारलेल्या गप्पा, चातुर्मास पाळताना ग्रंथ वाचन दासबोध, तुकोबांचे अभंग, परमहंस स्वामींची प्रवचनं. सांताक्रूझला ओशोच्या प्रवचनातून विचारांची खोली समजायची, ध्यान भक्ती यांतील गोडी कळायची. आकाशातील नक्षत्र व ग्रह यांची माहिती मिळायची आणि ज्योतिष विषयातली दारं किलकिली व्हायची.

दानाचं महत्त्व आचरणातून सांगतानाच ''देतो तो देव'' असं सांगायला विसरला नाहीत. श्रद्धा आणि अंधश्रद्धा यांतील भेदांवर किती रात्री संवाद व्हायचा. मुलांना काय वैचारिक देता येईल? याची टीपण करतानाच, पेपरमधलं विशेष वाचण्यासारखं असलं तर कात्रण कापून ठेवायचात. सद्धर्म, विवेक, चांदोबा, किशोर, दक्षता, अमृत याशिवाय रोजचे पेपर नवाकाळ, म.टा. रविवारी सगळेच असायचेच. कोडी सोडवत चित्र रंगवत रविवार कसा जायचा कळायचं नाही.

लायब्ररीतले शांत वातावरण, पुस्तक शोधताना बदलायचं आणि मनात कसंतरी व्हायचं, अखेर आवडतं पुस्तक सापडायचं. त्यावर थाप मारत म्हणायचात, ''हेच ते हे बघ.'' लॉटरी लागल्याचा आनंद व्हायचा तुम्हाला. कलेची काठी समजावताना, किती काय काय शिकवायचात. सगळ्या मुलांचं एक हस्तलिखित पंचखाद्य तयार करून घ्यायचात त्यांचं छान उद्घाटन व्हायचं.

या सगळ्या गोष्टी खूप किमती होत्या. अगदी अनमोल. तुम्ही घरातल्या नाही तर परिसरातील मुलांसाठी जगलात. 'स्व'पुरता परीघ आखायला तुम्हाला येतच नव्हता. पुढे याच झळाळत्या सोन्यासारख्या गोष्टी आयुष्याच्या प्रत्येक वळणावर उपयोगी ठरत होत्या. अनेक वादळं पेलली पावलोपावली. अडचणी होत्याच पण खंबीरता ढळली नाही. खूप प्रलोभनं असूनही वाट चुकली नाही. मार्ग सत्याचा असल्याने कठोर कसोट्या झाल्या. पण कधीही स्वतःच्या मनातून उतरलो नाही. समोरचा त्याच्या नजरेने पाहतो म्हणून वेडे ठरलो खूपदा, पण तरीसुद्धा आत्मविश्वास किंचितही ढळला नाही.

सगळ्या बालकांच्या कल्याणासाठी झटणारे मराठे गुरुजी लक्षात राहिले ते याच वेगळेपणामुळे. त्यांनी दिलेली धनदौलत अशी की, जवळ काही नसलं तरी आतून कायमच श्रीमंत वाटत रहातं. तुम्हाला जाऊन कितीही काळ लोटला तरी आठवण ताजीच असते. वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळी अधिक सुंदर, रसरशीत!

ही सगळी धनदौलत तुमच्या मंडळाच्या विचारांची. त्यामुळे आमचं आणि आमच्याबरोबर परिसरातील मुलांचं बालपण समृद्ध झालं. सत्य आणि खंबीरतेच्या पायाने बळकट झालं. निरोगी मनाने सर्वत्र पहाता आलं. त्याची मोठे झाल्यावर प्रचिती आली. सगळं आयुष्य सहज सोपं झालं आणि ईश्वराची साथ मिळाली. माणुसकी असणं हे माणूस जिवंत असल्याचं लक्षण मानलं तर अजून मी जिवंत आहे. तेही तुमची दौलत हातात घेऊन. वाटेने वेळ आल्यावर जमेल तशी माझी प्रार्थना ऐकलीत ना बाबा... हीच माझी श्रद्धांजली!

♦

# बंदी हसन-हुसेन

• श्री. अच्युत म. चक्रदेव (पृ.७३२), चिंचवड भ्रमणध्वनी : ९६२३५५०६३३

**ही** साधारण इ.स. १९७२ मधील येरवडा म. कारागृहातील घटना आहे. मी स्वयंपाकगृह प्रमुख तुरुंगाधिकारी म्हणून कार्यरत होतो. जवळपास सुमारे ४००० बंदीजनांचा स्वयंपाक नित्याप्रमाणे नियमानुसार सकाळी १०.३० वाजता पूर्णपणे तयार होता. निरोपाप्रमाणे त्या, त्या विभागाचे बंदी प्रमुख वॉर्डर हातात बादल्या, पोहोरे इ. घेऊन रांगेत उभे होते. मी वाटप सुरू करण्याचा इशारा देण्यासाठी तयार होतो. तेवढ्यात दोन बंदी पाण्याच्या भरलेल्या दोन, दोन बादल्या घेऊन आले. मी मनात विचार केला की आता पाण्याच्या बादल्या भरून घेऊन यायचे काय कारण? तेवढ्यात त्या दोन्ही बंदींनी अचानक त्यांचे हातातील भरलेल्या बादल्यांतील पाणी तेथे वाटप तयार असणाऱ्या सर्व अन्नपदार्थांवर भराभर ओतून टाकले. ४००० बंदींच्या तयार असणाऱ्या स्वयंपाकावर पाणी पडताच त्या दोन्ही बंदींनी एकमेकांचे हातावर टाळ्या दिल्या. या सर्व प्रकाराने मी अक्षरशः संतापलो. माझा मी राहिलोच नाही, मी त्या दोन्ही बंदींच्या दिशेने माझा मोर्चा वळवला. आणि आतापर्यंतचे सेवा काळात, माणुसकीच्या नात्याने मी केलेली नव्हती, ती गोष्ट मी संतापाच्या भरात केली. मी माझ्या हातातील वेताच्या छडीने त्या दोघांना सपासप, सपासप मारायला सुरुवात केली. मी मारत होतो, आणि ते ओरडत होते. ४००० बंदींचे स्वयंपाकाचे ते मातेरे करतात म्हणजे काय? माझे वरिष्ठ अधिकारी तेथे आले, त्यांनी कानोसा घेतला. त्यांनी रक्षकाला विचारले, ''कसला एवढा गोंधळ चालला आहे.'' रक्षकाने सांगितले, ''चक्रदेव साहेब, दोन बंदींना मारत आहेत, तेव्हा ते म्हणाले, ''चक्रदेव मारत आहेत, ते उगीच नक्कीच मारणार नाहीत. त्यांची छडी तुटली तर ही माझी छडी घ्या म्हणावं आणि ती छडी त्यांनी रक्षकाच्या हातात मला देण्यासाठी दिली.


माझा संताप थोडा कमी होताच, विव्हळत असलेल्या त्या दोघांना मी जवळ बोलावून घेतले व शांतपणे विचारले, ''तुम्ही असे का केलेत? एवढ्या ४००० लोकांच्या स्वयंपाकात पाणी ओतायचे नीच कर्म तुम्ही का केलेत?'' त्यांनी माझे एकदम पाय पकडले व ते म्हणाले, ''आम्ही दोघेही मुस्लीम आहोत, जेलमध्ये आम्हाला मांसाहार मुळीच मिळत नाही. आम्हाला तो हवा होता. आम्ही अधीक्षक साहेबांना सुद्धा विनंती केली. त्यांनी आमच्याकडे लक्षच दिले नाही. म्हणून तो राग, ती चीड आम्ही आज शाकाहारी जेवणावर काढली.''

यावर त्यांना मी जवळ बोलावले, व म्हणालो, हे पहा मी काही मारकुटा जेलर नाही, पण आम्ही शाकाहारी पदार्थ का देतो, याबाबत त्यांना सात्त्विक, राजस, इ. आहार व त्याचे दुष्परिणाम याबद्दलचा फरक त्यांच्या लक्षात चांगलाच येईल अशा पद्धतीने त्यांना समजावून दिला. फक्त शाकाहारी व बलदंड अशा प्राण्यांची हत्ती, गवा, गेंडा इ.ची उदाहरणे दिली. त्यांना ती मनोमन पटली. त्यांनी आम्ही असा आततायीपणा पुन्हा मुळीच करणार नाही, असे निक्षून सांगितले व ते माझ्या पाया पडू लागले. आम्ही आता मुळीच मांसाहार करणार नाही असे ते म्हणाले.

याहून मला तरी काय पाहिजे होते? हसन व हुसेन यांना रक्षकाबरोबर कारागृहाच्या रुग्णालयात पाठवले व मी माझ्या कार्यालयात समाधानाने परत आलो.

♦

## सहवेदना





**ल. पां. मराठे**
धाकोरे– आजगांव येथील रहिवासी व वेंगुर्ला पाटकर हायस्कूलमधील निवृत्त शिक्षक लक्ष्मण (बबन) पांडुरंग मराठे (७०) यांचे २५ जून रोजी धाकोरे येथे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, १ विवाहित मुलगी, जावई व मुलगा असा परिवार आहे. हिंदी प्रचार सभा वेंगुर्ला शाखेचे कार्यवाह म्हणून त्यांनी काम पाहिले होते.

# स्वरांचा नंदादीप

• प्राची देवल



'माझ्याबरोबर आजवर ज्या गायिका गायल्या, त्यात दीदी आणि आशाताईंनंतर जे नाव येतं ते म्हणजे अनुराधा मराठे'... ज्येष्ठ भावगीत गायिका अनुराधा मराठे यांच्या आत्मचरित्राच्या प्रकाशनाच्या समारंभात पंडित हृदयनाथ मंगेशकर यांनी काढलेले हे उद्गार. पुण्याच्या बालगंधर्व रंगमंदिरात हा हृद्य कार्यक्रम तीन वर्षांपूर्वी झाला. ते ऐकताना वाटलं, की पंडितजींचे हे शब्द म्हणजे अनुराधाताईंना मिळालेले 'भारतरत्न'च. इतकी वर्षं गाण्यावर प्रेम करून ते मांडणं, त्याचा दर्जा टिकवणं याची पोचपावती बाईंना मिळाली होती.

मी आवड म्हणून त्यांच्याकडे गाणं शिकायला लागले. माझ्यासाठी त्या अनुराधामावशीच आहेत. संयमित असं हे व्यक्तिमत्त्व. साधेपणा इतका, की या मोठ्या गायिका आहेत, असं त्यांच्या वागण्या-बोलण्यावरून वाटणार नाही. जो सादरीकरणात अव्वल असतो, तो शिकविण्यात असेलच असे नाही. पण अनुराधामावशी याला अपवाद. अनेक उपजत कला अंगात असतानाही स्वतःच्या आंतरिक आवाजानुसार गाणं हे क्षेत्र त्यांनी निवडलं; अन्यथा नृत्य, चित्रकला, साहित्य, अभिनय इत्यादी क्षेत्रांत त्यांना कुठेही अटकाव नाही. लताबाई, आशाबाई फार मोठ्या आहेत... पण त्यांचं मोठेपण अनुराधाबाई ज्या खुबीने उलगडतात... त्याला तोड नाही. या बाईंचं निरीक्षण आणि समज किती विलक्षण आहे, हे समजायला त्यांचा सहवास घडायला हवा. आता जग फारच जवळ आलं आहे; पण त्या काळी रेडिओव्यतिरिक्त या दोघींना सतत ऐकायला मिळणं फार दुर्मीळ होतं. अशात या दोघींना सतत लोकांपुढे त्याच दर्जानं मांडण्याचं काम अनुराधाबाईंनी केलं आहे. यासाठी काय लागतं... ते फक्त एक गायकच समजू शकेल.

शास्त्रीय संगीतामध्ये एखादा राग बंदिशीमधून व्यक्त होतो. त्याचं चलन, लहेजा, विस्तार बंदिशीच्या माध्यमातून व्यक्त होतो. त्या रागाला एक विशिष्ट मर्यादा, आकृतीबंध असतो आणि त्या मर्यादेत अमर्याद अशा स्वतःच्या प्रतिभेचा आविष्कार एखादा शास्त्रीय गायक करत असतो. सुगम संगीतामध्येही प्रत्येक गाण्याचं एक चलन असतं. त्या गाण्याला भावनेने बांधलेलं असतं ते त्या संगीतकाराने. त्या गाण्याला स्वतःचा विस्तार असतो, लहेजा असतो. त्या संगीतकाराला अपेक्षित असलेल्या आकृतीबंधाच्या मर्यादा पाळून दीदींनी आणि आशाताईंनी स्वतःच्या अमर्याद प्रतिभेनं प्रत्येक गाणं सिद्ध केले आहे.

हे चलन, तो विस्तार, आकृतिबंध मावशींना समजला आहे, जाणवला आहे. गाणं शिकताना याचा अनुभव मावशींच्या प्रत्येक शिष्याला रोज येतो. त्यांची ही समज त्यांना इतरांपेक्षा फारच वेगळ्या उंचीवर नेते. त्यामुळेच त्यांना स्वतःला जी गाणी मिळाली, जी त्यांच्या नावावर नोंदली गेली. ती गाताना त्या कोणावरही अवलंबून नव्हत्या. त्या गाण्यांना त्या अगदी सहज न्याय देऊ शकल्या.

मावशी मनमिळाऊ आहेत. नेहमी गुरुऋणात राहणाऱ्या मावशी स्वतः अखंड कर्मयोगात राहणं पसंत करतात. त्यामुळेच वयाने सत्तरी कधी गाठली हे त्यांना कळलंच नाही. अखंड विद्यादान करणं आणि तेही हातचं राखून न ठेवता, ही त्यांची खासियत.

आई-वडिलांकडून मिळालेली साहित्याची जाण, त्यांच्या गुरूंकडून मिळालेली संगीतविद्या, नृत्याची आवड, अभिनयाची उत्तम जाण, निसर्गावर असलेलं प्रेम यामुळे त्यांच्यातील प्रतिभेला उत्तम जोड मिळाली. संसार सांभाळून त्यांना जेवढं करता आलं ते त्यांनी अव्याहत केलं. स्वतःची आवड जपली आणि लोकांना अखंड आनंद दिला. त्यांना काय मिळालं नाही, त्यापेक्षा त्यांना काय मिळालं... याचा आनंद त्यांना जास्त होतो. त्यामुळे त्या फार समाधानी आहेत.

*साभार : सकाळ*

♦

# जातानाचे शब्द

• श्री. यशवंत सुरेश मराठे (पृ. ४००), मुंबई भ्रमणध्वनी : ९८२००४४६३०

'मी असा काय गुन्हा केला?' हे शब्द प्रमोद महाजन यांनी आपल्या अंतसमयी उच्चारले होते असे म्हणतात. आपल्या सख्ख्या भावानेच गोळ्या घातल्यावर विचारांच्या कल्लोळातून त्यांना असे व्यक्त व्हावेसे वाटले होते. 'अरे, हे काय करताय?' असे इंदिराजींनी अतिशय अविश्वासाने आपल्या मारेकऱ्यांना विचारले होते. महात्मा गांधीजींचे जातानाचे शब्द होते, 'हे राम' तर चाफेकर बंधू किंवा भगतसिंग, राजगुरू व सुखदेव यांनी 'वंदे मातरम्' म्हणत मृत्यूचे स्वागत केले होते. तर 'मी या स्वार्थी जगात आता राहू शकत नाही' असे म्हणून साने गुरुजींनी जीवनयात्रा संपवली आणि 'सात भाऊ असते तरी मातृभूमीसाठी दिले असते; आता माझे काम संपले' असे ठामपणे सांगून स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांनी प्रायोप्रवेशन केले.

एखाद्याचे जातानाचे शब्द नेमके काय असतात याची आपल्याला अतिशय उत्सुकता लागून राहिलेली असते. एखादे वयोवृद्ध वडील गेल्यावर जेव्हा नातेवाईक भेटायला येतात तेव्हा 'काही बोलले हो ते जाताना?' असे हमखास विचारले जाते.

अगदी बोलायला यायला लागल्यापासून आपण अगणित वाक्ये बोलतो पण आयुष्याच्या अंतःकाळी जे बोलतो ते खरेखुरे असते. त्यात खोटेपणाचा, दांभिकपणाचा, मीपणाचा लवलेशसुद्धा नसतो. बऱ्याच वेळा आयुष्यातल्या चुकांची किंवा पापांची कबुलीही असू शकते. बालपण संपल्यानंतर इतका मनाचा निरागसपणा यापूर्वी कधीच अनुभवता आलेला नसतो. कदाचित समोर दिसत असलेल्या मृत्यूमुळे खऱ्याखुऱ्या जीवनाची जाणीव, आयुष्य संपताना होत असावी.

मी एका एकांकिकेबद्दल ऐकले होते की, ज्यात लेखकाने कल्पना अशी केली होती की, पराभव दिसायला लागल्यावर ॲडॉल्फ हिटलरने आपल्या नवपरिणीत वधूसह आत्महत्या केली होती. मग ज्या रात्री त्याने आत्महत्या केली, त्या रात्री त्याचा त्याच्या बायकोशी नेमका काय संवाद झाला असेल अशी कल्पना करून अतिशय कल्पकपणे दोघातले द्वंद्व त्यांनी उभे केले होते. पत्नीला जगायचे होते, सर्वसामान्य माणसाप्रमाणे संसार करायचा होता. पण हिटलरला शत्रूच्या हातात सापडायचे नव्हते. त्याला आपला अपमानास्पद मृत्यू नको होता. त्यामुळे आत्महत्येशिवाय त्याला दुसरा मार्ग दिसत नव्हता. 'आसक्ती' आणि 'विरक्ती' यातले नाट्य पाहताना दोघांनीही जीवनाच्या तत्त्वज्ञानावर केलेले भाष्य हा या एकांकिकेचा विषय होता. पत्नीच्या मनात मृत्यूच्या कल्पनेने आलेली थरारकता आणि त्यातून निर्माण झालेली अगतिकता मनाला स्पर्शून जाते आणि हे मृत्यू, मी मला हवा तसा जगलो, आता हवा तसा मरणार हा हिटलरच्या मनातील ठामपणा जाणवत राहतो.

जगणे व मरणे यात फार मोठी वैचारिक दरी असते. ती पार करण्याची इच्छा फार कमी जणांची असते. आपल्यापैकी जवळजवळ प्रत्येकाला त्या दरीपर्यंत जाऊच नये असे वाटत असते. कारण जगण्याची आसक्ती प्रत्येकालाच असते. तिथे मृत्यूचे स्वागत कोण आणि कसे करणार?

आयुष्यात 'मी' व 'माझे' करत इतकी संपत्ती आणि इतक्या वस्तू गोळा केल्या पण यातली एकही वस्तू मृत्यूबरोबर घेऊन जाता येणार नाही हे 'कळते पण वळत नाही.' वेगवेगळ्या फॅशनचे कितीही महागडे कपडे घातले तरी जन्माला येताना नागवे आलोय आणि मरतानाही तसेच जायचंय. येताना दोघांमुळे आलो आणि मेल्यावर चौघांच्या खांद्यावरून जायचंय. आपण एकटे काहीच करू शकत नाही. पण तरीही प्रत्येक हाव काही सुटत नाही. हे माझे, ते माझे, माझेही माझे आणि त्याचेही माझेच अशी आपली नेहमी भावना असते. जेव्हा मृत्यू समोर दिसायला लागतो, तेव्हा ही भावना बोथट होते. प्रत्येक चर्चमध्ये जशी कन्फेशन बॉक्स असते तशी काल्पनिक बॉक्स मृत्यूच्या जाणिवेने तयार होते.

आयुष्यात जे बेफामपणे वागलो, बोललो ते आठवू लागते. आयुष्यावर चढलेली खोटेपणाची आणि दांभिकतेची पुटे ढासळू लागतात. लहान बाळाची निरागसता मनात येऊ लागते. रागलोभाच्या आहारी जाऊन विस्कटून टाकलेली नाती पुन्हा गोळा करून आणाविशी वाटतात; खरे तर तोपर्यंत फार उशीर झालेला असतो. जेव्हा जगायचे असते तेव्हा आपण जगलेलोच नसतो आणि जगावेसे वाटू लागते तेव्हा मृत्यू समोर येऊन उभा ठाकलेला असतो.

भाऊसाहेब पाटणकर यांचा सुरेख शेर आहे, 'दोस्तहो, दुनियेस धोका, मेलो तरी आम्ही दिला। जाऊनी नरकात, पत्ता स्वर्गाचा आम्ही दिला।। हाय रे दुर्दैव माझे, सर्वास कळले शेवटी। सारे सन्मित्र माझे, तेथेच आले शेवटी।।'

आपल्यासारख्या सर्व पापी माणसांचा सर्वात शेवटचा मुक्काम नरक आहे हे त्यांनी नर्म विनोदाने मोजक्या शब्दात पटवून दिले आहे. पण काही काही माणसे खरोखरच वेगळी असतात. त्यांना जगण्याचीही आसक्ती नसते आणि मरण्याचीही भीती वाटत नाही. ही माणसे खऱ्या अर्थाने जीवन जगतात व हसऱ्या चेहऱ्याने मृत्यूला सामोरे जातात.

सामाजिक कार्यकर्ते ग.प. प्रधान यांनी मृत्यू हसत हसत स्वीकारला. आपला काळ जवळ आला आहे हे कळल्यावर त्यांनी आपला पुण्यातील राहता वाडा 'साधना ट्रस्ट' या संस्थेला फुकट देऊन टाकला. आपल्या एका डॉक्टर विद्यार्थ्याच्या हॉस्पिटलच्या सर्वात वरच्या मजल्यावरची खोली भाड्याने घेतली आणि स्वतः डाळ-भात बनवून मृत्यू येईपर्यंत जगत राहिले. खरे तर तो वाडा विकला असता तर त्यांना करोडो रुपये मिळाले असते. पण आयुष्यभर एक तत्त्वज्ञान उराशी बाळगून जगलेल्या प्रधानांनी निःस्वार्थीपणे त्यावर पाणी सोडले. पुलंनी तर आयुष्यात मिळालेल्या सर्व संपत्तीचा ट्रस्ट केला व समाजाकडून मिळालेली सर्व संपत्ती समाजाला परत देऊन टाकली. एक आदर्श जगणे यापेक्षा वेगळे काय असते?


सोळाव्या वर्षी ज्ञानेश्वरी लिहून एकविसाव्या वर्षी जिवंत समाधी घेणारे ज्ञानेश्वर माऊली म्हणजे विरक्तीचे टोक. त्यांच्या जीवनाचाही सोहळा होता आणि अजीवन समाधीचाही.

काही सामान्य माणसेसुद्धा असामान्य पद्धतीने जगतात आणि मृत्यूने आदर्श निर्माण करतात. मुंबईत राहणाऱ्या वसंत निकुंभ यांनी काही वर्षांपूर्वी दोन्ही हात पसरून मृत्यूचे स्वागत केले होते. आयुर्वेदाचा गाढा अभ्यास असलेले निकुंभ एखाद्या योग्यासारखे ८३ वर्षे जगले. आयुर्वेदात सांगितल्याप्रमाणे त्यांची रोजची दिनचर्या होती. त्यामुळे त्यांच्या नखात रोग नव्हता. पण एके दिवशी त्यांनी विचार केला की आयुष्यातल्या सर्व जबाबदाऱ्या पूर्ण झाल्या आहेत. लेकी, सुना, नातवंडे सारे सुखी आहेत. मग आता जगून काय करायचे? त्यांनी इच्छामरण घ्यायचे ठरवले. पत्नी जिवंत असताना हा असा निर्णय घेणे म्हणजे आक्रीतच. व्यवस्थित नियोजन करून हळूहळू एकेक खाद्यपदार्थाचा त्याग करत करत चार महिन्यांनी मृत्यूला त्यांनी बोलावून घेतले. या त्यांच्या निर्णयापासून परावृत्त करण्याचा सर्व नातेवाइकांनी खूप प्रयत्न केला पण ते आपल्या विचारांपासून ढळले नाहीत. तोंडी सांगून ऐकत नाहीत हे लक्षात आल्यावर सर्वांनी त्यांना पत्रे लिहिली आणि तुम्ही आम्हाला हवे आहात असे सांगितले तर त्या प्रत्येकाला स्व-हस्ताक्षरात त्यांनी लिहिलेली उत्तरे आजही वाचायला मिळतात. जी आयुष्याच्या तत्त्वज्ञानाने भरलेली होती. ज्याने आयुष्य आणि मृत्यू यांच्यातली सीमारेषाच पूर्णपणे पुसून टाकली आहे त्या माणसाचे तत्त्वज्ञान वाचत राहावेसे वाटते. जग हे मिथ्या आहे हे संतांनीच सांगितले पाहिजे असे नव्हे तर आपले आपल्यालाही ते कळू शकते हे वसंत त्र्यंबक निकुंभ यांच्या पत्रावरून आपल्याला कळते.

भिवंडीच्या धुंडिराज दीक्षित आणि त्यांच्या पत्नीचा मृत्यूसुद्धा असाच आदर्शवत होता. दोघांनाही कर्करोगाचे निदान झाले आणि त्या दिवसापासून दोघांनीही औषधोपचार थांबवला. दीक्षित सर सेवानिवृत्त शिक्षक होते. त्यांनी आपल्या मुलांना सांगितले की कर्करोगावर औषध नाही हे मी मुलांना शिकवायचो. मग मीच औषधोपचारावर तुम्हाला खर्च करायला का लावू? ते पैसे तुमच्या मुलांच्या शिक्षणासाठी वापरा. आम्ही तृप्त आहोत, आम्हाला जाऊ द्या! आणि खरोखरच त्या दाम्पत्याने कर्करोगाच्या वेदना शांतपणे सहन करत धीरोदात्तपणे जगाचा निरोप घेतला.

ज्याला जन्म आहे त्याला मृत्यू सुद्धा आहेच. जेवढ्या आनंदाने आपण जगण्याचा आनंद घेतो तेवढ्याच आनंदात मृत्यूचे सुद्धा स्वागत करायला हवे आणि आयुष्यभर असे जगायला हवे की मृत्यूसमयी अपराधीपणाची भावना फिरकता कामा नये. ♦

## अरे कोरोना



अरे कोरोना
क्यो रोना, क्यो रोना ।।धृ।।
किती जरी केला धिंगाणा
म्लेंच्छ, आंग्ल, पाणी पाजलेना शकहूणा।।
बाजी, थोरले पेशवे, शिवप्रभु, फडणीसनान।,
आले शिरावरी जरी घनघोर घाले,
दारिद्र्य, दुःख, अपमान झाले
शेंडी रिपूची उपटू सावरकर तात्या, केशव, माधव
आदी शंकर म्हणाले ना,
कोणाचीही मान नक्की उपटू मोदी नरेंद्र म्हणाले ना!
कंटाळा, आळस, शब्द मुळी नको, निराशा नको,
व्हा होकारार्थी, तलवार म्यांनाव की उपसा ना!
कोरोनापुढे नका जोडू मुळीच नको कर।
अति दूर नको कोरोनाने जाण्या नष्ट त्याला करू ना।
आणले चिन्याने संकट, करतील भारतीय नष्ट
भारतीय पडले भारी, चिनी नी लाल माकडांना
२१वे शतक हे आपुले, अजिंक्य भारत ठरणार ना

– **अच्युत चक्रदेव** (पृ.७३२), पुणे
भ्रमणध्वनी : ९६२३५५०६३३

# स्वातंत्र्यवीर सावरकर रचित स्वातंत्रतेचे स्तोत्र

• डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृ.१२०), वडाळा दूरध्वनी – ०२२ २४१५०८८९



**स्वा**तंत्र्यवीर सावरकरांनी ''जयोऽस्तुते श्रीमहमंगले! शिवास्पदे शुभदे। स्वतंत्रते भगवती! त्वामहं यशोयुतां वंदे।'' हे स्वतंत्रतेचे स्तोत्र फर्ग्युसन महाविद्यालयात शिकत असताना पुणे येथे वर्ष १९०३ मध्ये लिहिले आहे. २००३ वर्ष हे या स्तोत्राचे शताब्दी वर्ष होते.

आपल्या या हिंदुस्थानात, एखादा सांस्कृतिक कार्यक्रम असो, राजकीय कार्यक्रम असो वा सामाजिक, मनोरंजनपर करमणुकीचा कार्यक्रम असो या कार्यक्रमांत हे 'स्वतंत्रतेचे स्तोत्र' गायले जातेच जाते. गाणे इतके लोकप्रिय आणि सर्वतोमुखी असे हे 'स्वतंत्रतेचे स्तोत्र' झाले आहे. स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर आणि मंगेशकर कुटुंबीय यांनी गाऊन हे गीत अजरामर केले आहे.

देशभक्तीने भारावून जाण्याचे चैतन्यमयी सामर्थ्य या गीतामध्ये आहे. हे गीत ज्यावेळी म्हटले जाते तेव्हा सारा समुदाय उदात्त आणि पवित्र आणि वीररसात प्रभावशाली झाल्याचे दृष्टोत्पत्तीस येते.

आपल्या इष्ट देवतेचे वर्णन व स्तुती स्तोत्रामध्ये केली जाते. 'स्तूयते अनेक इति स्तोत्रे' म्हणजेच ज्याच्याद्वारे देवदेवतांची स्तुती केली जाते त्याला स्तोत्रे म्हणतात.

प्रत्येकाला काही ना काही दुःख असतेच, ते भोगत असताना सामान्य माणसाला आपल्याला कोणाचा तरी आधार हवासा वाटतो. अशावेळी त्या सर्व साक्षी सर्वशक्तिमान परमेश्वराच्या कृपेची अपेक्षा केली जाते आणि त्यासाठीच ही स्तोत्रे असतात. साडेसातीकरिता शनिमहात्म्य वाचले जाते, श्रीगुरुचरित्र दर गुरुवारी वाचले जाते. स्तोत्राद्वारे आपल्या इष्ट देवतेची स्तुती गाऊन तिला प्रसन्न करून घेणे हा स्तोत्रे म्हणण्यामागचा सरळ वा साधा हेतू असतो.

स्वातंत्र्यवीर सावरकर यांची भारतमाता हीच देवता आहे. तिच्या चरणी त्यांनी आपलं सर्वस्व अर्पण केलेले आहे. बालपणापासून देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढायचं त्यात आपली समीधा पडली तरी चालेल हेच जीवनाचं ध्येय त्यांनी मानलं. खडतर व कंटक मार्गावरून वाटचाल करतानाही निराशेला आपल्या जवळपास कधीही फिरकू दिले नाही.

महाविद्यालयात ज्ञानसंपादनाबरोबरच देशस्वातंत्र्याच्या प्राप्तीसाठी ते प्रयत्न करीत होते. 'अभिनव भारत' या 'मित्रमेळा'द्वारे त्यांनी देशभक्तीची मशाल पेटवली होती. त्याचवेळी परदास्यात गेलेल्या आपल्या स्वतंत्र भगवतीला अत्यंत कळकळीने स्वातंत्र्यवीर सावरकर साद घालीत होते. मनातील भावभावनांच्या कुसुमांना शब्दबद्ध करून 'स्वतंत्रतेचे स्तोत्र' गात होते.

### राष्ट्राची चैतन्यमय मूर्ती

राष्ट्राची चैतन्यमय मूर्ती असलेली स्वतंत्रदेवता नीतीची संपदा आहे. तिचे तेज भास्करासमान आहे. ही 'स्वतंत्र' देवता उत्तम, उदात्त, उन्नत आणि महन्मधुरांची सहचारी आहे. अधमांना कंठस्नान घालून त्यांच्या रक्ताने ती माखली आहे. पण सज्जनांसाठी ती नम्रतेने त्यांच्या सेवेस नि पूजनास तत्पर आहे. सूर्याप्रमाणे तेजस्वी असणाऱ्या, सर्व चराचर सृष्टी ज्या स्वातंत्र्य देवतेला शरण गेली आहे. योगीजनांनी जिला परब्रह्म म्हणून साद घातली. तिच्यासाठी मरणं म्हणजेच जगणं आणि तिच्याशिवाय जगणं म्हणजे मरणं, अशी स्वातंत्र्यवीर सावरकराची पराकोटीची उत्कट भावना या स्तोत्रात व्यक्त झालेली आहे.

आज आपले स्वार्थी, राजकारणी स्वातंत्र्यवीरांच्या या 'स्वतंत्र' देवतेला विसरले आहेत असे दुर्दैवाने म्हणावे लागते. आपल्या राजकर्त्यांना ह्या स्तोत्रातला भाव समजलेला दिसत नाही. काश्मीरचा प्रांत आम्ही गमावून बसणार आहोत की काय अशी परिस्थिती निर्माण होत आहे. काश्मीरमधल्या हिंदूंना हाकलून दिलं जात आहे. त्यांच्यावर सातत्याने अत्याचार होत आहेत.

बलाढ्य ब्रिटिश राज्य उलथावून टाकण्याचे सामर्थ्य स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या क्रांती चळवळीत होते. पारतंत्र्यात सुद्धा त्यांनी इंग्रज शासनाकडे संपूर्ण हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याची मागणी केली होती. कारण ती स्वातंत्र्यदेवता वेदांनी सांगितलेल्या मोक्षाचं नि मुक्तीचंच प्रतीक होती. आज निधर्मी वादाच्या आत्मघातकी विचारसरणीने आपलेच पवित्र ग्रंथ आणि प्रातःस्मरणीय राष्ट्रपुरुष आम्ही परके मानले ही दुर्दैवाची गोष्ट आहे.

स्वातंत्र्यवीर सावरकर आपल्या भारतमातेला दृढालिंगन देण्याची विनंती स्वतंत्रतेच्या देवतेला करीत आहेत आणि आपण मात्र अहिंसा, विश्वबंधुत्व व शांतता ह्या फसव्या शब्दांच्या मागे, मृगजळाप्रमाणे लागून स्वत्व व स्वाभिमानाची गळचेपी करीत

आहोत. हिमालयाच्या रम्य परिसरातून निघून जावं असं विरक्त नि विरागी शंकरालाही वाटलं नाही. निर्लोभी निलकंठालाही ह्या रम्यतापरिसराचा लोभ सुटला नाही. मग स्वतंत्र देवीला हा परिसर सोडून जावं असं का वाटलं? अमृतासारखा निर्मळ जान्हवीचा स्त्रोत टाकून निघून जावं असं स्वतंत्रतादेवतेला का वाटलं? असा प्रश्न स्वातंत्र्यवीर सावरकर करीत आहेत. कोहिनूरसारखा तेजस्वी हिरा आपल्या केशसंभारात स्वतंत्रता देवीने निशीदिनी माळावा एवढी सुबत्ता, वैभवसंपन्न असलेल्या सुवर्णभूमीचा त्याग करावा असं का वाटलं? अशा प्रकारची लक्ष्मी समान भारतमाता असताना तिचा त्याग करावा असं स्वतंत्रता देवतेला का वाटलं. भारतमातेला ढकलून ती दूर का निघून गेली? भारतमातेविषयीची पूर्वीची ममता आता आटली असावी म्हणून परक्यांचं दास्यत्व स्वीकारण्याची बुद्धी स्वतंत्रता देवतेला झाली का?

ह्या प्रश्नांची उत्तरे स्वतंत्रताच्या देवतेने द्यावीत अशी अपेक्षा स्वातंत्र्यवीरांनी ठेवली आहे. ती उत्तरे मिळावीत म्हणून त्यांचा जीव तळमळत आहे.

स्वातंत्र्यवीर सावरकरांना विद्यार्थीदशेत पडलेले प्रश्न उत्तर आयुष्याच्या सांजवेळी सुद्धा आमच्या राज्यकर्त्यांना पडत नाहीत. मात्र त्या प्रश्नांची आठवण करून देण्याची हीच वेळ आहे. 'स्वातंत्र्यतेच्या स्तोत्राच्या' शताब्दी वर्षानिमित्ताने त्यांना स्मरण करून देण्याचं आपलं कर्तव्य आहे. यासाठी या स्तोत्राचे स्मरण करून त्याप्रमाणे काही करण्याची हिंमत हृदयात निर्माण व्हायला पाहिजे.

समान नागरी कायदा, ३७० कलम रद्द करणे, हिंदू देवस्थाने परत मिळविणे, अखंड हिंदुस्थान निर्मिती, शिवरायांच्या हिंदवी स्वराज्याची पुन्हा स्थापना करणे अशी महत्त्वपूर्ण कामे जो करील तोच आम्हा हिंदूंचा नेता आणि तोच त्या स्वतंत्रतेच्या देवतेचा खरा उपासक नि कृतिशील भक्त.

**स्वतंत्रतेचे स्तोत्र उच्चरवाने गा!**

स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या ह्या स्तोत्रात पौरुषत्वाचं नि वीरत्वाचं बीज दडलं आहे. प्रसंग हलाहल पचवण्याचं सामर्थ्यही शंकराप्रमाणं आपल्यात निर्माण होईल हा आत्मविश्वास आहे. एवढा बोध जरी या गीतातून आपल्याला व राज्यकर्त्यांना झाला तरी देशासाठी प्राणपणाने लढलेल्या सर्व देशभक्त क्रांतिकारकांना त्यांनी केलेल्या त्यागाचं सार्थक झाले असे वाटेल. राज्यकर्त्यांना, आता तरी जागे होऊन वीर सावरकर रचित स्वातंत्रतेचे स्तोत्र उच्चरवाने गा! स्वतःचे पापक्षालन करून घ्या. ईश्वर राज्यकर्त्यांना सद्बुद्धी देवो! ''भारतमाता की जय!''
।। वंदे मातरम् ।। ♦

---

# स्वतंत्रतेचे स्तोत्र

जयोऽस्तु ते श्रीमहन्मंगले! शिवास्पदे शुभदे
स्वतंत्रते भगवती! त्वामहं यशोयुतां वंदे ।।धृ।।
राष्ट्राचें चैतन्य मूर्त तूं नीति-संपदांची,
स्वतंत्रते भगवती! श्रीमती राज्ञी तूं त्यांची
परवशतेच्या नभांत तूंची आकाशीं होशी
स्वतंत्रते भगवती! चांदणी चमचम लखलखशी।।
गालावरच्या कुसुमी किंवा कुसुमांच्या गाली
स्वतंत्रते भगवती! तूंच जी विलसतसे लाली
तू सूर्याचे तेज उदधिचें गांभीर्यही तूंची
स्वतंत्रते भगवती! अन्यथा ग्रहण नष्ट तेंची।।
मोक्ष मुक्ति हीं तुझीच रुपें तुलाच वेदांती
स्वतंत्रते भगवती! योगिजन परब्रह्म वदती
जें जें उत्तम, उदात्त, उन्नत, महन्मधुर तें तें
स्वतंत्रते भगवती! सर्व तव सहचारी होतें।।
हे अधम-रक्त-रंजिते। सूजन - पूजिते! श्री स्वतंत्रते
तुजसाठी मरण तें जनन
तुजवीण जनन तें मरण
तुज सकल चराचर शरण
भरत भूमीला दृढालिंगना कधि देशील वरदे
स्वतंत्रते भगवती! त्वामहं यशोयुतां वंदे।।१।।
हिमालयाच्या हिमसौधाचा लोभ शंकराला
क्रीडा तेथे करण्याचा का तुला वीट आला?
होय आरसा अप्सरसांना सरसे करण्याला
सुधाधवल जान्हवीस्त्रोत तो कां गे त्वां त्यजिला?।।
स्वतंत्रते! या सुवर्णभूमीत कमती काय तुला?
कोहिनूरचें पुष्प रोज घे ताजें वेणीला
ही सकल - श्री - संयुता । आमुची माता! भारती असता
कां तुवा ढकलुनी दिधली?
पूर्वीची ममता सरला
परक्यांची दासी झाली
जीव तळमळे, कां तूं त्यजिलें उत्तर याचें दे!
स्वतंत्रते भगवती! त्वामहं यशोयुतां वंदे।।२।।

(समग्र सावरकर खंड ७वा)
स्वातंत्र्यपूर्व काळातील हिंदुस्थानचे मानचित्र)

# अर्थव्यवस्थेला सावरायचंय?
# तर या प्राधान्याच्या दहा गोष्टी कराव्याच लागतील !

• डॉ. गिरीश जाखोटिया (पृ. १२८), विलेपार्ले, मुंबई भ्रमणध्वनी : ९८२००६२११६

नमस्कार मित्रांनो! आर्थिक ताकद असेल तर सारं जग झुकतं तुमच्यासमोर. आता बघाना, अमेरिकेचं ऐकून युरोपीय राष्ट्रे चीनविरुद्ध पाऊल उचलू इच्छित नाहीत. ही चीनची 'आर्थिक' दादागिरी आणखी बऱ्याच छोट्या देशांना मान्य आहे कारण चीनसोबतचा व्यापार, चीनचं आर्थिक सहाय्य, चीनची गुंतवणूक, अगडबंब प्रकल्प व्यवस्थापनातील चिनी कौशल्य इत्यादी गोष्टी त्यांना हव्या आहेत. काही वर्षांपूर्वी आमचा सुद्धा आर्थिक वाढीचा दर असाच आश्वासक होता. सोबतीला 'एक मोठी लोकशाही' असण्याचं कौतुकही होतं. आस्तेकदम आमची पकड ढिली होत गेली. 'डिमोनेटायझेशन'ने तालुका व खेड्यांमधील अर्थकारणाचं कंबरडं मोडलं. नंतर आवश्यक असणारा 'जीएसटी' तर आला परंतु तांत्रिक व प्रक्रियात्मक तयारी पुरेशी नसल्याने छोटे व मध्यम आकाराचे उद्योग जवळपास वर्षभर त्रासात होते. सरकारी, खाजगी आणि सहकारी बँकांची बुडित देणी वाढल्याने लहान उद्योजकांना कर्ज मिळणे अवघड होऊन बसले. या सोबतीला ग्रामीण अर्थव्यवस्था चांगलीच मंदावल्याने छोटे शेतकरी सुद्धा सैरभैर झाले. गोष्टी सावरूया म्हणेपर्यंत 'कोरोना' आला नि मंद झालेली गाडी रुळावरून घसरू लागली. बेरोजगारीत भर पडली, लोकांची बचत खंगावत चालली, पगार कमी झाले, करभरणा कमी झाल्याने विकासाच्या कामांवर व गरिबांच्या सवलतींवर परिणाम होऊ लागला. भरीसभर म्हणून 'सार्वजनिक व्यवस्था' स्वच्छ व बळकट करण्याऐवजी आम्ही खाजगीकरणात जास्त स्वारस्य घेऊ लागलो. (यातील वाईट प्रकार असा की सवलतीच्या सार्वजनिक सेवा उपभोगून आर्थिकदृष्ट्या स्थिरस्थावर झालेलेच काही कृतघ्न वेडे खाजगीकरणाची बेलगाम भलावण करू लागले.)

जगभरातील विविध देशांच्या अर्थशास्त्रीय चुकांमधून आम्ही काही शिकणार आहोत की नाही? आज विविध प्रकारचे आर्थिक, औद्योगिक, सामाजिक व प्रशासकीय धोक्यांचे सूचक इशारे मिळत असताना आम्ही त्यांच्याकडे दुर्लक्ष करतो आहोत का? जपान व द. कोरियातील बऱ्याच उद्योजकीय संधी तेथील काही मोठ्या कंपन्यांनी लुबाडल्याने तिथे गंभीर आर्थिक असंतुलन तयार झाले. ब्राझील, मेक्सिको, द. आफ्रिका, मलेशिया इ. विकसनशील देशांच्या नेत्यांनी भ्रष्टाचार करीत सामान्य जनतेच्या गरजांकडे दुर्लक्ष केल्याने एकेकाळी वेगाने वाढणाऱ्या या अर्थव्यवस्था आज खूप अडचणीत सापडल्या आहेत. तेथील त्रस्त जनता आता रस्त्यावर येऊन आपला 'आर्थिक विकासाचा लढा' लढू लागली आहे. प्रचंड खाजगीकरणाचं ओझं वाढलेली अमेरिकी अर्थव्यवस्था नव्याने 'सामाजिक अर्थशास्त्रा'चे धडे गिरवू लागली आहे. इतकी वर्षे 'जागतिक पोलीस' असणारा हा बलाढ्य देश आता स्वतःच्या रचनात्मक आर्थिक घोडचुकांमधून बाहेर पडण्याचा प्रयत्न करतोय. फ्रान्स, इटली, ब्रिटन, स्वीडन इ. देश आर्थिक वाढीचा दर सुधारण्यासाठी अंदाजपत्रकीय तुटीचा बाऊ न करता कनिष्ठ मध्यमवर्गीय व गरिबांच्या उत्थानासाठी मोठं आर्थिक नियोजन करताहेत व तो कसोशीने राबवताहेत. तेल व शस्त्रास्त्र विक्री वजा केल्यास रशियाच्या आर्थिक ढाच्यात फारशी ताकद उरत नाही. याचाच फायदा घेत चीन आता रशियाला आपल्या नादी लावतोय. यामुळे चीनचा भूराजकीय धोका आमच्यासाठी बराच वाढला आहे. एक 'आर्थिक विकासाचं ऊर्जा केंद्र' म्हणून आमची जी ख्याती होती ती आता उरलेली नसल्याने आमचे मतलबी मित्रदेश राजकीय व सामरिक संकटात आमची किती मदत करतील, ही गंभीर अनिश्चितता उभी ठाकली आहे. या सर्व पार्श्वभूमीवर आम्ही देशांतर्गत सामाजिक-सांस्कृतिक-राजकीय प्रश्नांना आणखी जटील करणे म्हणजे अंतर्बाह्य चक्रव्यूहात अडकणे होय.

अर्थव्यवस्थेला मूळपदावर आणण्यासाठी दहा गोष्टी प्राधान्याने व समांतरपणे कराव्या लागतील. पहिली बाब म्हणजे आमच्या अर्थव्यवस्थेबद्दल जे प्रश्नचिन्ह जगाच्या पटलावर निर्माण झाले आहे ते दूर करणे. यासाठी देशांतर्गत उद्योजकीय व सामाजिक वातावरणाचं आश्वासक चित्र पुन्हा योग्य त्या पारदर्शकतेने उभे करावे लागणार आहे. या दिशेने पहिले पाऊल (म्हणजे दुसरी प्राधान्याची गोष्ट) असले पाहिजे ते गरिबी रेषेभोवती वाढत जाणाऱ्या भारतीयांना आर्थिक आधार देणे. याकरिता 'गरिबी'ची सुयोग्य व्याख्या आम्ही करायला हवी. किमान एक ते दोन वर्षे असंघटित क्षेत्रातील कामगारांना व छोट्या शेतकऱ्यांना 'आर्थिक रसद' पुरवली पाहिजे. यासाठी आमची ढोबळ तूट एक - दीड टक्क्यांनी वाढली तरी चालेल. ही तूट भरून काढण्यासाठी तिसरी गोष्ट करावी लागेल - अतिश्रीमंतांच्या मालमत्तेवर व वार्षिक उत्पन्नावर 'कोरोना कर'

लावणे. या यादीत श्रीमंत शेतकऱ्यांचाही समावेश करावा. यातील बहुतांश 'राजकारणी शेतकऱ्यां'ची मालमत्ता एकतर कार्यकर्त्यांच्या नावे असते किंवा हवाला मार्गे ती पांढरी करून भारतात आणलेली असते अथवा परदेशी इस्टेटींमध्ये गुंतवलेली असते. चौथी गोष्ट ही स्टॉक मार्केट व कमॉडिटी मार्केटमध्ये अल्पमुदतीची खरेदी – विक्री करणाऱ्या किंवा सट्टा खेळणाऱ्या गुंतवणूकदारांवर अधिकचा कर लावणे. फसफसणाऱ्या स्टॉक मार्केटमधील खेळाडूंचे हे राष्ट्रीय कर्तव्य आहे. यातील बरेचजण राष्ट्रवादी नारे फावल्या वेळेत व्हॉट्सअॅपवर लावतच असतात की!

पाचवी गोष्ट ही ८० कोटी भारतीयांसाठी अत्यंत आवश्यक असणाऱ्या सार्वजनिक व्यवस्थेबद्दल आहे. ऊर्जा, प्रवास, पाणी, औषधोपचार, शिक्षण, इंधन, निवारा, विमा इ. प्राथमिक गरजा या सार्वजनिक व्यवस्थेतूनच पुरविल्या गेल्या पाहिजेत. याबाबतीत जो खाजगीकरणाचा गोंधळ अमेरिकेने घातला, त्या गोंधळाने तब्बल ७० टक्के अमेरिकनांना अडचणीत टाकले आहे. 'नवगरिबां'ची संख्या तिथे वाढते आहे नि म्हणून असंतोषही वेगाने वाढतो आहे. ६० टक्के तरुण लोकसंख्या असणाऱ्या आपल्या देशांत दर्जेदार व्यावसायिक, शेतकी व उद्योजकीय शिक्षण कमीतकमी शुल्क आकारून आम्हाला देता आले पाहिजे. यासाठी अर्थसंकल्पीय तरतूद ही किमान १० टक्के इतकी करावी लागेल. यातून दर्जेदार तरुण कर्मचारी व छोटे उद्योजक आम्ही निर्माण करू शकलो तर बाहेरील देशांना इथे कारखाने, सेवाउद्योग उभे करण्यासाठी आम्ही उद्युक्त करू शकू. सार्वजनिक सेवांचे अनावश्यक व धोकादायक खाजगीकरण जिथे जिथे आम्ही आजपर्यंत केलेले असेल ते व्यूहात्मक, वित्तीय व सामाजिक परिमाणांवर आम्ही तपासायला हवे. इथे 'कम्युनिस्ट, सोशालिस्ट' इ. हाकारे देत भ्रष्ट भांडवलदारांच्या शिकारीच्या शौकाला मदत करणारे मूर्ख कमी नाहीत. सहावी गंभीर गोष्ट ही बँकांची बुडित येणी वसूल करण्याबाबत. ही येणी बुडविण्यातील हेतूपुरस्सर सहभागासाठी संबंधित बँकर्स, कंपन्यांचे संचालक, सरकारी सिस्टीममधील उच्चपदस्थ व दलालांच्या भ्रष्ट इस्टेटी सहज तपासून ताब्यात घेता येतील. यामुळे आमची बँकिंग प्रणालीही शुद्ध होईल.

सातवी गोष्ट करण्याबाबत बरीच सरकारे बऱ्याच देशांत इच्छुक नसतात. मोठ्या कंपन्यांनी किती सरकारी सवलती लबाडीने खाल्ल्या आहेत, सरकारी वरदहस्त वापरून किती मक्तेदाऱ्या या कंपन्यांनी निर्माण केल्या आहेत, सार्वजनिक बँकांची किती प्रचंड कर्जे यांनी क्षमतेच्या पलीकडे घेतली आहेत, किती छोट्या उद्योजकांचे यांनी शोषण केले आहे आणि नैसर्गिक साधनसामग्रीचा किती नाश केला आहे, हे तातडीने व पारदर्शकतेने तपासायला हवे. या कंपन्यांना झुकते माप देताना सरकारने काही अर्थसंकल्पीय तरतुदी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या वापरल्या आहेत का आणि या गोष्टीचा गरिबांना द्यावयाच्या सवलतींवर परिणाम झाला आहे का, हे तपासावे लागेल. आठवी अत्यावश्यक गोष्ट ही छोट्या शेतकऱ्यांना पुढे नेण्याबाबत. नवे शेतकी कायदे हे छोट्या शेतकऱ्यांच्या भल्याचे नाहीत. या कायद्यांनी बाजारातील अनिश्चितता, मोठ्या कंपन्यांची दादागिरी, ग्राहकांवर या कंपन्यांच्या मक्तेदारीचा वाईट परिणाम व छोट्या असंघटित शेतकऱ्यांचे आणि किराणावाल्यांचे शोषण इ. गोष्टी संभवतात. मुळात बाजारू अर्थव्यवस्थेत शेतकऱ्यांचं संघटन ही पहिली अत्यावश्यक बाब आहे, जी कोणत्याही राजकीय पक्षाने गांभीर्याने घेतलेली नाही.

छोट्या व मध्यम आकाराच्या उद्योजकांना सवलतीच्या व्याजदराने बँकांकडून पुरेसे कर्ज मिळणे अत्यावश्यक आहे. जीएसटी प्रणाली अधिक कार्यक्षम करणे, मोठ्या कंपन्यांकडून होणारे यांचे शोषण थांबविणे, यांच्याबाबतीतल्या आयकर प्रणालीला सुटसुटीत करणे, कोरोनाच्या वाईट प्रभावातून बाहेर पडण्यासाठी यांना विशेष सवलतीने खेळते भांडवल उपलब्ध करून देणे इ. बाबी या नवव्या गोष्टीत येतात. मोठा रोजगार निर्माण करणाऱ्या कापड, ऑटोमोबाइल व बांधकाम उद्योगातील मरगळ नीटपणे व तातडीने दूर करावी लागेल. दहावी गोष्ट ही मध्यमवर्गीय गुंतवणूकदारांसाठी. आज यांच्याकडे मध्यम व दीर्घमुदतीची गुंतवणूक करण्यासाठीची योग्य साधनेच नाहीत. महागाई, परताव्याची अनिश्चितता, रोकडतेची कुचंबणा व योग्य माहितीचा अभाव या बाबींनी यांना त्रस्त केले आहे. कोणत्याही अर्थव्यवस्थेतील भांडवल उभारणीचा कणा हा मध्यमवर्ग असतो जो आज विविध कारणांमुळे गोंधळलेला व म्हणून घाबरलेला आहे. अर्थात विविध राजकीय – सांस्कृतिक विचारांमध्ये हाच वर्ग आज खूप दुभंगलेला असल्याने तो गंभीर आर्थिक समस्यांकडे जागरूकतेने पहात नाहीय, ही चिंतेची व खेदाची बाब आहे! आमच्या अर्थव्यवस्थेला रुळावर नीटपणे आणण्यासाठी कोणताही राजकीय अभिनिवेश न ठेवता सत्ताधाऱ्यांनी व विरोधकांनी या दहा गोष्टींवर प्राधान्याने काम करायला हवे. अर्थव्यवस्था टिकली तर देश टिकेल आणि देश टिकला तर बाकी गोष्टी आपोआपच टिकतील! आर्थिकदृष्ट्या सक्षम भारत मग चीनच्या भूराजकीय दादागिरीलाही थोपवू शकेल.

*Right to change/reproduce withheld, IPC copyright Act 1957. The article can be forwarded with author's name for public awareness.*


*वरील लेख भारतीय प्राताधिकार कायदा १९५७ नुसार फेरफार अथवा नक्कल निषेधित. लेखकाच्या नावानिशी हा लेख विविध समूहांमध्ये पाठविता येईल.*

# यशाची गुरुकिल्ली - मनाचं व्यवस्थापन!

• डॉ. गिरीश जाखोटिया (पृ. १२८), विलेपार्ले, मुंबई भ्रमणध्वनी : ९८२००६२११६

नमस्कार मित्रांनो! गोकुळाष्टमीच्या हार्दिक शुभेच्छा!! यानिमित्ताने कृष्ण कोण होता या माझ्या (मॅजेस्टिक तर्फे प्रकाशित झालेल्या) पुस्तकातील कृष्णाचा आपल्या नातवांशी संवाद इथे देत आहे.

एके संध्याकाळी कृष्ण शांतपणे बसलेला होता. त्याचा नातू अनिरुद्ध आणि अर्जुनाचा नातू परीक्षित काही महत्त्वाच्या शंकांचं निरसन करण्यासाठी त्याच्याकडे आले. आजोबांना अगणित शंका विचारण्याचा त्यांचा हक्क होताच. कृष्णाने अतीव आनंदाने दोघांच्या प्रश्नांची विस्ताराने उत्तरे दिली. 'मनाच्या व्यवस्थापना'वरचं ते अत्युत्तम मार्गदर्शन होतं.




परीक्षित (जिज्ञासेने ओतप्रोत भरलेल्या आवाजात) - आजोबा, आम्ही ऐकत आणि पहात आलो आहोत की खूप बुद्धिमान असलेले लोकही बऱ्याचदा यशस्वी होत नाहीत.

कृष्ण (प्रसन्नतेने) - खरंय. याचं साधं - सोपं कारण म्हणजे यश मिळविण्यासाठी फक्त बुद्धिमत्ता पुरेशी नसते. आपल्या अवतीभवती घडणाऱ्या जवळपास ऐंशी टक्के घटना या माणसांनी घडवलेल्या असतात. माणसे फक्त तर्काने वागत नाहीत. ती भावनाशील होऊनही वागत असतात. तांत्रिक भाषेत सांगायचं झाल्यास माणसे वागताना आपल्या मेंदूसोबत मनाचाही आधार घेतात.

**अनिरुद्ध** : मेंदू हे दृश्य आहे तर मन अदृश्य!

**कृष्ण** (हसत) : म्हणूनच मनाला नियंत्रणात ठेवणं अवघड असतं.

**परीक्षित** : पण मग ते कसं करायचं?

**कृष्ण** : विवेक आणि विज्ञानाचा आधार घेत. एखादं उत्तम अस्त्र शिकणं ही वैज्ञानिक म्हणजे मेंदूची प्रक्रिया असते. त्या अस्त्राचा वापर सुयोग्य कारणासाठी करणं म्हणजे 'विवेक'.

**परीक्षित** : म्हणजे आजोबा, अश्वत्थाम्याकडे विज्ञान होतं, पण विवेक नव्हता.

**कृष्ण** : हो, अगदी योग्य उदाहरण तू दिलंस. त्याच्या ब्रह्मास्त्राने तू मातेच्या पोटातच मरणार होतास. मी तुला वाचवलं. म्हणजे विज्ञानाचं उत्तर मी विज्ञानाने दिलं.

**अनिरुद्ध** : आजोबा, मनाचं व्यवस्थापन थोडं सोपं करून सांगा ना.

**कृष्ण** : 'विवेक' समजावून घेणं हे मेंदूचं काम असतं परंतु विवेकाने वागणं हे मनोवस्थेवर निर्भर असतं. यासाठी मेंदूने सावध राहून सातत्याने मनाला विवेकाने वागण्याची सूचना करीत रहायचे असते. एकदा विवेकाचं वळण मनाला लागलं की आपसूकच ते तसं वागू लागतं. म्हणजे नदीत बुडणाऱ्याला फारसा मेंदूने विचार न करता आपण वाचवायला जातो. हा 'विवेकी' मनाचा उत्स्फूर्त प्रतिसाद असतो.

**परीक्षित** : परंतु आजोबा, बरेच पंडित, राजे, सेनापती हे 'विवेका'ची व्याख्या स्वतःच्या सोयीने करतात व त्यालाच 'शास्त्र' म्हणत पुनःपुन्हा वापरत रहातात.

**कृष्ण** : व्वा परीक्षित, अगदी बरोबर बोललास. पितामह भीष्म अशा चुकीच्या व्याख्येलाच बळी पडले. आजोबा युधिष्ठीर यांनी आजी द्रौपदीला द्यूताच्या खेळात पणाला लावले, हा भयंकर 'अविवेक' होता. 'कुणावरही अन्याय न करता सर्वांना समान न्याय देणारं आचरण म्हणजे विवेक', असं ढोबळमानाने आपण म्हणूयात.

**अनिरुद्ध** (आनंदी होत) : हं, आजोबा हे किती समजायला सोपं झालं.

**कृष्ण** : परंतु प्रत्येक वेळी अशी सोपी व्याख्या करणं शक्य नसतं.

**अनिरुद्ध** : म्हणजे?

**कृष्ण** : जसे की बऱ्याचदा कपटाला कपटानेच नष्ट करावं लागतं. अशावेळी सत्याच्या व न्यायाच्या बाजूने वापरलेलं

कपट हे क्षम्य ठरतं. हां, सत्य आणि न्याय यांची व्याख्या जर लोककल्याणाची असेल तर ती योग्य ठरेल.

**परीक्षित** : मुळात आजोबा, मनाला वळण का लावावं लागतं?

**कृष्ण** (प्रसन्न होत) : अगदी योग्य प्रश्न विचारला आहेस. विविध प्रकारच्या भावनांचा संग्रह हा आपल्या मेंदूतच जमलेला वा निर्मिलेला असतो. तो कधी जनुकांमधून येतो तर कधी अनुभवांच्या परिणामातून उद्‌भवतो. या भावना जेव्हा प्रसवतात तेव्हा त्या प्रक्रियेला आपण 'मनाचं वागणं' असं म्हणतो. या विविध भावनांना नियंत्रित ठेवण्याच्या कौशल्याला आपण 'मनाचं वळण' अथवा 'मनावर केलेले संस्कार' असंही म्हणतो.

**अनिरुद्ध** : कळलं आजोबा. थोडक्यात असं की भावना आटोक्यात ठेवायच्या.

**कृष्ण** (हसत) : दोन्ही प्रकारच्या, म्हणजे चांगल्या आणि वाईट, अशा भावनांचा अतिरेक वा अनाठायी प्रदर्शन किंवा अयोग्य माणसासाठी केलेली खिरापत ही वाईटच असते.

**परीक्षित** (थोडासा संकोचत) : हं, युधिष्ठीर आजोबा अशा चांगल्या भावना कौरवांना दाखवत नि म्हणून भीम आजोबा खूप चिडत, असं मी ऐकलंय.

या विधानावर कृष्ण अगदी मनमुराद हसतो. अनिरुद्धही मग हसू लागतो.

**कृष्ण** : तू का हसतोयस अनिरुद्धा?

**अनिरुद्ध** (संकोचत) : बलराम आजोबा चिडले की तुम्ही त्यांना शांत करता.

याही विधानावर कृष्ण मोठ्याने हसला. सर्वच आजोबा आपल्या नातवांसोबत असा निखळ आनंद घेतात.

**परीक्षित** : आजोबा, महत्त्वाच्या वाईट भावनांचा मनावरील परिणाम सांगाल?

**कृष्ण** : या वाईट भावना नियंत्रणात राहिल्या नाहीत की मग त्या हळूहळू आपले 'स्थायी दोष' होतात. क्रोध, भीती, अहंकार, स्वार्थ, द्वेष आणि आळस, हे आपले सहा गंभीर भावनिक दोष होऊ शकतात. हे सहा दोष एकमेकांचे कारकही असतात.

**परीक्षित** : दुर्योधन आजोबांना भीम आजोबांचा व कर्ण आजोबांना अर्जुन आजोबांचा प्रचंड द्वेष वाटायचा.

**कृष्ण** : खरंय, द्वेषातून त्यांचा क्रोध वाढत गेला. द्वेषाचं शमन करण्यासाठी ते स्वार्थी झाले. या दोघांचा अहंकारही प्रचंड होता.

**अनिरुद्ध** : आजोबा, तुम्ही सांगितलेल्या सहाही भावनिक दोषांबद्दल संक्षेपाने सांगाल?

**कृष्ण** : एखादी घटना वा विचार अथवा निर्णय आवडला नाही की आपण जी टोकाची प्रतिक्रिया देतो ती 'क्रोध' असते. हा क्रोध सात्त्विक वा खुनशीही असेल. परंतु क्रोधाने मन अस्थिर होतं नि मग मेंदूही नीट काम करत नाही. यामुळे मग भरपूर चुका होऊ लागतात.

**अनिरुद्ध** : क्रोध टाळायचा कसा?

**कृष्ण** : दोन गोष्टींची सवय लावायची – लगेच प्रतिक्रिया नाही द्यायची आणि घडलेल्या गोष्टीचं त्रयस्थपणे विश्लेषण करायचं.

**परीक्षित** : हं, त्रयस्थपणा जमायला हवा.

**कृष्ण** : क्रोधाची कारणं बरीच आहेत. 'अहंकार' हे त्यापैकी एक गंभीर कारण. अहंकारी लोकांना क्रोध पटकन येतो. अहंकार कमी करण्यासाठी आपल्यापेक्षा अधिक चांगल्या लोकांच्या पराक्रमाचे मापदंड पहावेत. आपण लगेच नम्र होतो.

**अनिरुद्ध** : आजोबा, नम्रतेऐवजी काही लोकांची असूया वाढते नि मग तिचं रूपांतर हे द्वेषात होतं.

**कृष्ण** : होय, ही शक्यता असतेच. यासाठी एकच गोष्ट करण्याचा ध्यास ठेवायचा, की मी स्वतःला कसा सुधारू शकेन. यामुळे आपली ऊर्जा वाचेल व आपण मोठ्या लक्ष्यावर काम करू शकू.

**अनिरुद्ध** : खरंय आजोबा. तुमचे एक आतेभाऊ, शिशुपाल नावाचे, या द्वेषामुळेच चुकत गेले ना?

**कृष्ण** (हसत) : अनिरुद्धा, तू आम्हा सगळ्यांबाबत बरीच माहिती गोळा केली आहेस!

या विधानावर दोघेही नातू हसतात.

**कृष्ण** : 'भीती' हा खूप मोठा भावनिक दोष आहे मुलांनो. स्वसंरक्षणार्थ काळजी घेणे, अमर्याद धोके टाळणे हे आवश्यकच. परंतु बऱ्याच वेळा आपण अनाठायी भीती बाळगतो. अशा अवास्तव वा काल्पनिक भीतीमुळे अंगी गुणवत्ता असूनही आपण महत्त्वाचे निर्णय घेत नाही नि मग यशाला गवसणीही घालत नाही.

**परीक्षित** : भीतीची समस्या भेडसावतेच. ती टाळायची कशी?

**कृष्ण** : भीतीतून चिंता उद्‌भवते जी आपलं मानसिक खच्चीकरण करत जाते. भीती टाळण्यासाठी प्रत्येक समस्येच्या मुळाशी जायचं. जमेल ते उत्तर शोधायचं व त्यावर काम करायचं. ज्या गोष्टी आपल्या नियंत्रणात नसतात त्यांची चिंता करून वा भीती बाळगून उपयोग नसतोच. अत्यंत महत्त्वाची बाब म्हणजे उद्याच्या

संभाव्य आव्हानांना भिडण्यासाठी आजपासूनच आपण साधने, सहकारी आणि संकल्पनांची तजवीज करायला प्रारंभ करायचा.

**परीक्षित** : हां, मला ऐकल्याचं आठवतं. तुम्ही महायुद्धाच्या बरंच आधी आम्हा पांडवांसाठी मोर्चेबांधणी चालू केली होती. महाराज द्रुपदांपासून ही सुरुवात झाली होती.

**कृष्ण** : होय. 'उत्तम नियोजन' म्हणजे किमान अर्ध्या यशाची खात्री!

**अनिरुद्ध** : आजोबा, आळसाबद्दल आता सांगा.

**कृष्ण** : स्पर्धा किंवा आव्हाने नसतील, संसाधने मुबलक असतील आणि महत्त्वाकांक्षा नसेल तर मनुष्य बहुदा आळशी होतोच. यासाठी सातत्याने नवनव्या मापदंडांचा शोध घेतला पाहिजे व त्यांच्यावर काम केलं पाहिजे. याचं सर्वोत्तम उदाहरण म्हणजे तुमचे अर्जुन आजोबा. वनवासाच्या कालखंडातही या माझ्या परममित्राने विविध शस्त्रास्त्र – कौशल्ये मिळवली. एकही घटिका त्याने आळसात काढली नाही. या वयात आजही तो काहीनाकाही करत असतोच. म्हणूनच तो सर्वश्रेष्ठ धनुर्धारी गणला जातो.

परीक्षिताचा चेहरा अभिमानाने फुलला. अनिरुद्धाच्या चेहऱ्यावरही आपल्या 'आतेआजोबां'साठीचं कौतुक स्पष्ट दिसू लागलं. कृष्ण प्रसन्नपणे दोघांकडे पहात होता.

**परीक्षित** : आजोबा, स्वार्थामुळेच धृतराष्ट्र पणजोबांनी कौरवांचा म्हणजे स्वतःच्या मुलांचा अंत ओढवून घेतला ना?

**कृष्ण** : धृतराष्ट्र काकांचं आंधळं पुत्रप्रेम म्हणजे स्वार्थाची परिसीमा!

**अनिरुद्ध** : परंतु आजोबा, स्वार्थ म्हणजे स्वतःचं भलं साधणं ना? असं तर प्रत्येकजणच करतो!

**कृष्ण** (मंद स्मित आणत) : स्वतःचं भलं साधण्यात गैर काही नाही. परंतु ते साधताना दुसऱ्यावर अन्याय होता कामा नये. याच्या पुढची पायरी म्हणजे स्वतःचं भलं साधताना इतरांचं, विशेषतः दुर्बलांचं भलंही साधता आलं पाहिजे. किंबहुना त्यांचं भलं साधल्यानंतर स्वतःचं भलं पाहिलं पाहिजे.

**परीक्षित** : असं वागणं खूप अवघड आहे ना आजोबा?

**कृष्ण** (गंभीर आवाजात) : तीच तर आपल्या चारित्र्याची आणि कर्तृत्वाची खरी परीक्षा असते मुलांनो! तोच नेता लोकांच्या हृदयावर राज्य करतो जो आपल्या मुलांच्याही आधी प्रजेचा विचार करतो.

**अनिरुद्ध** : पण यासाठी स्वार्थाच्या सीमा कळायला हव्यात.

**कृष्ण** : सोपंय ते. 'स्व + अर्थ' म्हणजे स्वार्थ. आपण आधी स्वतःला जाणून घेतलं पाहिजे. या 'स्व'ला जाणणं म्हणजे जगण्याचा उद्देश जाणणं. जेवढा उद्देश इतरांसाठी मोठा, तेवढा तुमचा पराक्रम मोठा. स्वतःच्या कुटुंबासाठी तर कुणीही जगेल! पितामह भिष्मांची प्रतिज्ञा ही स्वतःच्या म्हणजे फक्त कुरुवंशाच्या रक्षणापुरती होती. त्यातही कुरुवंशातील स्त्रियांकडे दुर्लक्ष केलं गेलं. पितामहच जर असे वागले असतील तर धृतराष्ट्र काका व त्यांची मुले त्या पुढील पायरी गाठणारच!

स्वार्थाबद्दलच्या या कृष्णाच्या स्पष्टीकरणाने दोन्ही नातू प्रभावित झाले होते.

**कृष्ण** (हसत) : मुलांनो, आज इथे थांबूयात?

**दोघेही नातू** : होय आजोबा. आज खूप काही कळलं. आता आम्ही दोघे बसून एक छानशी उजळणी करतो म्हणजे ऐकलेलं नीटपणे लक्षात राहील.

कृष्णाने प्रसन्नवदनाने नातवांच्या डोक्यांवर हात फिरवला. दोघेही नातू मग तिथून बाहेर पडले.

♦


| पुस्तकासाठी १ सप्टेंबरपासून इथे संपर्क करावा | | | |
|---|---|---|---|
| मॅजेस्टिक गिरगाव नाका, मुंबई | ७५०६८८७७२२ | मॅजेस्टिक, राम मारुती रोड, ठाणे | (०२२) २५३७६८६५ |
| मॅजेस्टिक, शिवाजी मंदिर, दादर (प) | ९८९२२२०२३९ | मॅजेस्टिक, शनिवार पेठ, पुणे | ९९२२३४४०८१ |
| ऑनलाइन खरेदीसाठी | www.MajesticReaders.com | | |
| सवलतीची किंमत | रु. २०० | छापील किंमत | रु. २५० |

# सोशल इंटेलिजन्स

• पुष्कराज वामन मराठे (पृ.५०३), पुणे भ्रमणध्वनी : ९८२२१०२०२३

जून महिन्याच्या 'हितगुज'मध्ये मी आर्टिफिशिअल इंटेलिजन्स या तांत्रिक विषयाची थोडी माहिती लिहिली होती. या अंकात विद्यार्थ्यांना आवश्यक असलेल्या दुसऱ्या एका विषयाबद्दल थोडं लेखन करत आहे.

एखादे काम उत्तमरीत्या पूर्ण करणे आणि ते पूर्ण केलेले काम फायदेशीर करणे हे दोन भिन्न भाग आहेत. यासाठी अनेकदा एकापेक्षा अधिक व्यक्तींचा उत्तम समन्वय आवश्यक असतो.

एक चित्रकार एकांतात तल्लीन होऊन उत्तम कलाकृती रेखाटू शकेल परंतु त्या कलाकृतीची माहिती कलाप्रेमींपर्यंत प्रसारित करून प्रदर्शित करण्यासाठी लागणारी कौशल्ये त्या चित्रकाराकडे असतीलच असे नाही. इथे कला प्रदर्शनी (आर्ट गॅलरी) चालवण्यासाठी लागणाऱ्या कौशल्यांची आवश्यकता असते. त्या चित्रकारात आणि कला प्रदर्शनीमध्ये योग्य समन्वय असणे हे दीर्घकालिक यशासाठी आवश्यक असते.

संगणक क्षेत्रात साधारण एका प्रॉडक्टच्या यशामागे ८ ते १० वेगवेगळे रोल्स कार्यरत असतात. कंपनीच्या व्याप्तीनुसार हे रोल्स कमी-अधिक होत असतात.

गेली अनेक वर्षं एका बहुराष्ट्रीय कंपनीत सीनिअर प्रॉडक्ट मॅनेजर हा रोल केला असल्याने याचा नित्य अनुभव मला आला आहे. अनेक आंतरराष्ट्रीय स्टेकहोल्डर्ससोबत समन्वय राखणं हे जिकिरीचे काम असते. प्रॉडक्ट तयार करणे आणि विकणं हा समान दुवा असला तरी प्रत्येक रोलची व्यावसायिक (आणि वैयक्तिक) उद्दिष्ट, आणि आव्हाने वेगळी असतात. जे सॉफ्टवेअर इंजिनीयर्स ह्याचे ज्ञान अवगत करून घेतात ते अधिक परिणामकारक काम करू शकतात.

सध्या विद्यार्थ्यांना तांत्रिक ज्ञान मिळवण्याचे पुष्कळ मार्ग उपलब्ध होत आहेत. देशी-विदेशी संगणक कंपन्या, शिक्षण क्षेत्रासाठी आपले प्रॉडक्ट अधिकाधिक उपयुक्त करण्यासाठी सरसावल्या आहेत. त्यातील अनेक भारतीय कंपन्यांचा खूप मोठा विस्तार होऊन त्या परदेशातील कंपन्या सुद्धा विकत घेऊन आपला प्रभाव वाढवत आहेत. हे तांत्रिक ज्ञान वापरताना इतर सहकाऱ्यांशी आवश्यक असलेला समन्वय हा तयार करावा लागतो.

हा समन्वय तयार करणे, जोपासणे, आणि वृद्धिंगत करणे हे ऑनलाइन माध्यामध्ये मिळवणं कठीण आहे.

गेल्या दीड वर्षांच्या लॉकडाउनमध्ये विद्यार्थ्यांना परस्पर समन्वय साधण्याची संधी खूप कमी वेळा मिळाली असेल. त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेला अमूल्य काळ वाया गेला आहे. ऑनलाइन शाळेत सतत 'माइक म्यूट करा' हे वाक्य ऐकून इंटरॅक्टिव्ह टाइमचा बहुतेक रिॲक्टिव्ह टाइम झाला आहे. मोठ्या मुलांचे, मित्रमैत्रिणींचे झूम किंवा गुगल कॉल होत असले तरी ते अपूर्ण आहेत. लहान इयत्तेतील मुलांना मात्र हा पर्यायही उपलब्ध नव्हता त्यामुळे सोशल इंटेलिजन्स मिळवण्याची संधी खूप कमी झाली आहे. त्यासाठीचा एक पर्याय म्हणजे मुलांसाठी पालकांनी किंवा घरातील इतरांनी निवडक गोष्टी किंवा अनुभव सांगणे.

माझ्या एका परिचितांकडून ऐकलेला एक अनुभव त्यांच्याच शब्दात मांडत आहे. असे छोटे अनुभव आपण सुद्धा मुलांसोबत शेअर करावेत असे वाटते, व त्यानंतर त्यांचे मत जरूर जाणून घ्यावे म्हणजे चर्चेतून या विषयीचे शिक्षण होऊ शकेल.

You learn every day from people.
I called a plumber to repair my leaking tap in the kitchen. He took out his spanner from his bag. It was half broken.
He separated the pipe. It was choked inside. This needed cutting the pipe. He took out a broken hacksaw blade from his bag, and started cutting the pipe.
Why can't he use proper tools, I wondered!
He did his job quite well. I offered him Rs 200/-, but he said the job is worth Rs 50/- only.
He said more money will disturb him. He will be sad when others don't pay him Rs 200/-
I said: buy proper tools using the extra money.
He said....even the new ones will break. These are already broken, so will sustain.
And my work should be good, not the tools alone.
I offered him tea....but he denied, saying he needs to rush to his next job of fixing the leaking taps !
He doesn't like waste of water, hence he has taken up this job, after his retirement. Such people make the country big!

पुण्यातील ज्ञान प्रबोधिनी संस्थेच्या प्रज्ञा मानस संशोधिकेतून बुद्धिमत्ता विकसन या विषयीचे दोन अभ्यासक्रम मी पूर्ण केले आहेत. या विषयाची आवड असल्यामुळे अनेक ग्रामीण आणि शहरी विद्यार्थ्यांशी संपर्क होत आहे व पालक व मुलांबरोबर काम सुरू आहे. ♦

# माझी फॉरेनची मुशाफिरी

• श्री. उल्हास मराठे (पृ. ६०१), सुरेंद्रनगर, गुजरात भ्रमणध्वनी : ९८२५२२३७३८

**पहिली यू.एस.ए.ची टूर**

आता मे. टेक्सपिनचा किंग पिन बेअरिंग आणि क्लच रिलीज बेअरींगचा चांगलाच जम बसला होता. अमेरिकेत थ्रस्ट बेअरिंग शीटमेटलमधून करतात. अशाच एका कंपनीशी कंत्राट करण्यासाठी दिलीपभाईंना निमंत्रण होते. ही कंपनी अंटार्टियाजवळ होती. तेव्हा दिलीपकाकांनी मला व बाबूकाकांना सोबत चलण्याची संधी दिली. अजून मी यू.एस.ए.ला गेलो नव्हतो व मला व्हिसापण नव्हता. संपूर्ण तयारीनिशी व्हिसा ॲप्लिकेशन केला. ज्या कंपनीत जाणार होतो त्यांचे पत्र, दिलीपकाकांचा व्हिसा व पासपोर्टची कॉपी जोडली आणि नशिबाचे दार उघडले. मला १० वर्षांचा बिझीनेस व्हिसा मिळाला.

मी, बाबूकाका, दिलीपकाका मुंबई ते अटलांटा गेलो. तिथे आम्हाला घ्यायला श्री. संपत म्हणून एक गुजराथी, दिलीपकाकांच्या ओळखीचा होता. तिथून आम्ही दुसऱ्या विमानाने कनेक्टिकेटला गेलो. कनेक्टिकेटला तेव्हा दिलीप काकांची मुलगी व जावई होते. ते मुलीकडे व मी व बाबूकाका संपत साहेबांकडे गेलो. दुसऱ्या दिवशी आम्ही फॅक्टरी पहायला गेलो. एक बाईच ती मॅनेज करत होती. त्यांचे प्रॉडक्ट आमच्याशी मिळते जुळते होते पण प्रोसिजर जरा वेगळी होती. मास प्रॉडक्शन टेक्निक होते व तुलनेने स्वस्त होते. त्यांच्याशी पुढे बोलणी काही जमली नाहीत. ते टेक्नॉलॉजी ट्रान्सफरसाठी फारच पैसे मागत होते. आतापर्यंत अमेरिकेत येऊन पण हायवेवरच होतो. त्यामुळे माझे पहिले अमेरिकेचे इम्प्रेशन फक्त हायवे आहेत व तुरळक घरे. दुसऱ्या दिवशी मी व बाबूकाका एक ट्रान्सफर प्रेस पहायला गेलो. निडल बुशचे प्रॉडक्शन करण्यासाठी त्याची आवश्यकता होती. मशीन खूप मोठे होते पण किंमत फारच जास्त होती. तरी आम्ही साधारण ४० टक्के कमी किमतीची ऑफर देऊन आम्ही परत आलो. रस्त्यात आम्ही जर्मनीला थांबलो होतो. नंतर एक प्रदर्शन होते. ते झाल्यावर मी व बाबूकाका जर्मनीत एका जुन्या मशीनच्या डीलरकडे गेलो. तिथेही चांगला प्रेस होता. आम्हाला हवा होता तसाच. ते डीलर फक्त ग्रायंडरमध्येच डीलिंग करत होते पण चुकून त्यांच्याकडे हा प्रेस आला होता. आम्ही परत हॉटेलवर आल्यावर आम्हाला फोनवर त्याने किंमत सांगितली ती साधारण यू.एस.ए.च्या प्रेसपेक्षा ९० टक्के कमी होती. सर्वांना वाटले आमची ऐकण्यात काहीतरी चूक झाली असावी. मग आम्ही त्यांना खूप चर्चेनंतर अजून १० टक्के कमी करून ऑफर दिली आणि ती त्यांनी तुरंत मान्य केली. अशी आमची पहिलीच यू.एस.ए. टूर जर्मनीत सक्सेसफुल झाली व आमचा सर्व खर्च वसूल झाला.

१९९८ नंतर सुमारे ३ महिन्यांनी एक युरोपची टूर चालू होती. कधी एखाद्या प्रदर्शनानिमित्त तर कधी मार्केटिंगच्या रेग्युलर फॉलो-अपसाठी गेलो की शनिवार ते सोमवार असा ९ दिवसांचा दौरा असायचा. ह्या शनिवारी जायचे होते तर आज गुरुवारी काटोच्या विलफ्रीडचा फोन आला, ''मराठे मोठा प्रॉब्लेम झाला आहे. माझी नोकरी धोक्यात आहे. तू धाडलेल्या बेअरिंगमध्ये ग्रीस टाकायचे विसरून गेला आहेस. मला पुढील आठवड्यात त्याची डिलिव्हरी द्यायची आहे, मी कस्टमरला शब्द देऊन बसलो आहे. आता काय करायचे ते तूच सांग.'' मी शांतपणे त्याला सांगितले, ''तू काळजी करू नकोस मी शनिवारी निघून रविवारी संध्याकाळी रॅलटेला पोहचतो. दोन दिवसागतच सर्व बेअरिंग ओके करून देतो.'' तो म्हणाला, ''ते शक्य नाही. सर्व बेअरिंगला पक्की कव्हरं आहेत. कव्हरं काढल्याशिवाय आत ग्रीस टाकता येणारच नाही.'' मी परत त्याला शांत केला व प्रॉमिस केले, ''तू अजिबात काळजी करू नकोस मी मंगळवारी संध्याकाळपर्यंत सर्व बेअरिंग ओके करतो. तू माझे रविवारचे हॉटेल बुकिंग कर.'' रॅलटे हे रोटरडॅमच्या जवळचे एक छोटे गाव आहे. एक चर्च, एक हॉटेल, एक बाजार, एक रेल्वे स्टेशन. रेल्वे स्टेशनहून चालतच हॉटेलला जाता येते. हॉटेलच्या उजव्या हाताला चर्च व समोर बाजाराचे दोन रस्ते. असे एखाद्या चित्रासारखे टुमदार गाव आहे. एकदा युरोप कप फुटबॉलची फायनल आम्ही (मी व उर्वशीबेन) त्याच्या तळघरात पाहिली होती. मॅच चालू होती तोपर्यंत रेस्टॉरंटमध्ये जवळजवळ ५० लोकं बीअर पीत टी.व्ही. पहात होते. मॅच पुरी होताच २ कर्मचारी व आम्ही दोघेच राहिलो.

लगेच मी महादेव इंडस्ट्रीवाल्या दोन भावांना बोलावले. त्यांना एक ग्रीस गन दिली व बेअरिंगमध्ये ग्रीस भरण्यासाठी एक फिक्श्चर बनवायला सांगितले. प्रथम त्यांच्या लक्षात येईना पण मग त्यांना समजले. शुक्रवारी सकाळी ते फिक्श्चर घेऊन

आले, आम्ही त्याची ट्रायल घेतली व उत्तम रिझल्ट आला. मी ४ कपडे कमी करून ते फिक्श्चर बॅगेत घातले. कंपनीच्या लेटरहेडवर त्याचे चलान केले. कारण त्याचा आकार गनसारखा असल्याने एअरपोर्टवर नक्की अडवणार होते.

सर्व घेऊन मी रविवारी दुपारपर्यंत रॅलटेला पोहोचलो. सोमवारी सकाळी विलफ्रीड आला व मला मिठी मारली. (मला तो एका वेगळ्याच स्टाइलनी मराठे म्हणतो) Marrathe you save me. नंतर जातानाच एका दुकानातून आम्ही मोठा ग्रीसचा डबा घेतला. त्यांनी मग त्याच्या गोडाउनमध्ये मला एक टेबल व पॅलेटवर सर्व बेअरिंग आणून दिली. मला म्हणाला, ''आतातरी मी तुला मदतीला कोणी देऊ शकत नाही. पण उद्याला प्रयत्न करीन.'' मी कामाला लागलो. प्रथम ४ बेअरिंगमध्ये ग्रीस भरून दिले. बाहेर टेंपरेचर ७ डिग्री होते तर गोडाउनमध्ये ३ डिग्रीच होते. बेअरिंग पॅक केलेली आधी उघडायची, त्याचे प्लास्टिक बॅगेतून बाहेर काढायचे व मग ग्रीस भरायचे. साधारण १.५ कि. वजनाचे एक बेअरिंग होते. ३ डिग्रीला ते हातात घेतल्यास हात पूर्ण बधीर व्हायचा. हे काम हातात मोजे घालून जमत नव्हते. पहिल्या ४ बेअरिंग्ज तो घेऊन गेला व अर्ध्या तासात सांगत आला, ''एकदम बरोबर.'' मी विचारले, ''एवढा वेळ का लागला'' तर त्या पठ्ठ्याने बेअरिंग मधोमध कापून पाहिले की आत ग्रीस आहे की नाही. मी त्याला सांगितले, ''भल्या ग्रहस्था, साधे वजन केले तरी समजते की ५ ग्रॅमने वजन वाढले आहे.'' पण त्याला आतले ग्रीस पाहिल्याशिवाय त्याची खात्री होत नव्हती. मग मी प्रॉडक्शनला लागलो. लंच टाइमपर्यंत फक्त २०० बेअरिंग्ज झाली होती. नंतर तो त्याच्या बॉस मि. कावेला घेऊन आला. कावे म्हणजे त्या गावचा राजाच. ६.५ फूट उंच, गोरा गोमटा एकदम फिट माणूस. त्याची ऑफिसची रूम ३०' X ३०' आहे. आतमध्ये सुंदर पद्धतीने अनेक बेअरिंगची मॉडेल्स लावलेली आहेत. तो म्हणाला बॉस, ''तुम्हाला एका जादुगाराची ओळख करून देतो.'' बॉस म्हणाला, ''मी मराठेला ओळखतो. हा जादूगार कधी झाला?'' मग मला म्हणाला, ''कर जादू.'' मी २ बेअरिंग्जमध्ये ५ ग्रॅम ग्रीस भरून दाखवले. बॉस खूश झाला व मला १ असिस्टंट दिला. तो माणूस मला बेअरिंग उघडून द्यायचा व ग्रीस भरल्यावर परत पॅक करायचा. मधून-मधून मला कॉफी पण आणून द्यायचा. त्यामुळे संध्याकाळपर्यंत आमची ८५० बेअरिंग झाली. अजून साधारण १००० बेअरिंग्ज बाकी होती. रात्री तो व त्याचा बॉस मला ६० कि. मी. ड्राइव्ह करून जेवायला घेऊन गेले. येता जाता मी चांगली झोप काढली. एकंदर मिशन सक्सेसफुल झाल्याने दोघेही खूश होते. पण अशा केलेल्या कामाची इंडियामध्ये कोणालाच कल्पना नव्हती. ही बेअरिंग्ज राणपूरमध्ये बनलेली होती व घाईघाईत सुरेंद्रनगरला न येताच परस्पर गेली होती पण सर्व जबाबदारी मे. लक्साइटवर होती.

प्रत्येक १ वर्षाआड लास वेगासला ऑटोमोटिव्ह आयटम्सचे प्रदर्शन असते. ह्या वेळेला दिलीपभाई, कीर्ती भाई दोघांनाही वेळ नव्हता. त्यामुळे मी व उर्वशी बेन दोघेच होतो. प्रदर्शनाच्या आदल्या दिवशी आम्ही जाऊन स्टॉल लावला. लहानच स्टॉल असल्याने फार वेळ लागला नाही. स्पेक्ट्रमचा स्टॉल नव्हता पण ती सर्व मंडळी आली होती. त्यांनी आम्हाला व त्यांच्या इतर सप्लायर्सना रात्री डिनरला बोलावले होते. सकाळी ओपनिंग सेरेमनी झाल्यावर १०.३०च्या सुमारास ४ मेक्सिकन लोकं आली. त्यांनी एका गोणीत थोडीफार बेअरींग भरून आणली होती. आमच्यासमोर जोरात आदळून म्हणाले, ''ही पहा तुमची रीजेक्टेड बेअरिंग्ज.'' आम्ही दोघेही चक्रावून गेलो. मग मी जरा धीर करून बोललो, ''ही तुम्ही कोणाकडून, केव्हा घेतली होती. त्या आधी तुम्ही काही पत्रव्यवहार केला आहे का? आमच्या टेक्निकल डिपार्टमेंटला आम्ही ती धाडू व तुम्हाला रिपोर्ट कळवू. आता तुम्ही चहा, पाणी, थंड पिऊन जा व संध्याकाळी आपण बोलू.'' उर्वशी बेन खूपच घाबरल्या व स्टॉल सोडून त्यांच्या मैत्रिणीबरोबर निघून गेल्या. दुपारी ३.३०च्या सुमारास त्या आल्या. त्यापूर्वी स्पेक्ट्रमवाल्याचा मुलगा दोनदा त्यांची चौकशी करून गेला होता. तो पण ४.३० च्या सुमारास आला व विचारू लागला, ''मेक्सिकोवाल्यांची बेअरिंग पाहिली का?'' तोपर्यंत मी सर्व बेअरिंग पाहिली होती व ती सर्व जाणूनबुजून डॅमेज केली होती. ती बेअरिंग्ज स्पेक्ट्रमनी मेक्सिकोवाल्यांना सप्लाय केली होती. थोड्यावेळाने समजले की खरे दुखणे कुठे आहे. आतापर्यंत अशी सीरियस कम्प्लेंट कधीच आली नव्हती. ह्याच मेक्सिकोवाल्यांना के. डी.आर.ने हीच बेअरिंग ऑफर केली होती व आम्ही ज्या भावाला स्पेक्ट्रमला विकतो त्याच्यापेक्षा थोड्या कमी भावाला. स्पेक्ट्रम आमच्या भावावर ३० टक्के वाढवून त्यांना विकत होते. त्यामुळे के.डी.आर.चा भाव त्यांना ४० टक्क्यांनी कमी वाटला. म्हणून त्यांनी स्पेक्ट्रमला कम्प्लेट केली आणि स्पेक्ट्रमच्या सांगण्यावरूनच त्यांनी हे नाटक केले होते. एकंदर परिस्थिती लक्षात घेता आम्ही त्यांना के.डी.आर. शी बोलायला सांगितले. मी समजावले, ''ह्यात काहीतरी कोटेशन देताना गडबड झाली आहे असे वाटते. तुम्ही त्यांना सप्लाय करता हे माहीत असते तर के.डी.आर.नी त्यांना कोट केले नसते.'' त्या रात्री के.डी.आर. खूपच अपसेट होती. मी त्यांना डी.जे.आर. शी फोनवर बोलायला सांगितले. डी.जे.आर.नी समजावल्यावर

जरा शांत झाल्या. त्यातच स्पेक्ट्रमवाल्यांचा फोन आला, तुम्ही रात्री जेवायला येऊ नका. हे समजल्यावर त्या आणखीनच भडकल्या. ''एवढे झाल्यावर काय मी त्यांच्याकडे जेवायला जाणार होते का? त्यांनी असा फोनच का केला, एक तर के.डी. आर.ची ही मोठी चूक आहे, असे वेडेवाकडे, बिझिनेस एथिक न सांभाळता कामे करतात आणि स्वत: बाजूला राहून आम्हाला गोत्यात आणतात.'' पुढचे सर्व प्रदर्शन पूर्ण टेंशनखाली उरकले. असाच एक प्रकार कोरीयाला झाला.

दिनांक : ३० जुलै २०१८

मी व व्यास साहेब एका शुक्रवारी आठवड्याच्या मुलाखती संपवून संध्याकाळी सार्क ब्रुकनच्या रेल्वे स्टेशनवर पोचलो. शनिवारी, रविवारी आराम करून परत पुढच्या कामाला आम्ही लागणार होतो. आरामासाठी हक्काचे टूरिस्ट हॉटेल होते. ते एका सिंग साहेबांचे असल्याने शनिवार, रविवार ते खूपच डिस्काउंट द्यायचे. रेल्वे स्टेशनवर तिकिटाला फारशी गर्दी नव्हती. आम्ही एका कागदावर ''फ्रँकफर्ट मेन २ टिकिटस् सेकंड क्लास वन वे'' असे लिहून तिथल्या तिकीट विंडोवर दिले. त्या बाईंनी खुणेनीच आम्हाला थांबायला सांगितले. तिला फारसे इंग्लिश येत नव्हते. १०-१५ मिनिटे झाली तरी ती आम्हाला तिकीटच देत नव्हती. हाताच्या खुणेनेच आम्हाला थांबायला सांगत होती. आमची ६-२० ची गाडी लागली होती. ५-५५ झाले तरीही ती शांतच होती. विचारले. तिने शेजारच्या बारीवरील माणसाशी जर्मनमध्ये बोलून आम्हाला सांगण्यास सांगितले. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे शुक्रवारी संध्याकाळ ६ ते सोमवार रात्री १२ पर्यंत वीकएन्डचे ५० टक्के डिस्काउंट असते.

आमची गाडी ६ नंतरची असल्याने डिस्काउंट घेण्यासाठी ६ नंतरच तिकीट घेणे आवश्यक असल्याने तिने थांबायला सांगितले होते. वर दिलगिरीदाखल म्हणाली की, ''आमच्या सिस्टीमच्या लिमिटेशन्समुळे मी तुम्हाला ॲडव्हान्समध्ये डिस्काउंट तिकीट देऊ शकत नाही जर जर्मन गव्हर्न्मेंट तुम्हाला डिस्काउंट देऊ पहात आहे तर मी का देऊ नये?.'' किती ही माणुसकी!

इन कोरिया - ही माझी कोरियातली दुसरी ट्रिप होती. प्रथम मी एकटाच गेलो होतो. तिथे आमचा टेक्टाइल बेअरिंगचा एजंट होता. त्याचे मेन बाजारपेठेत जिम मिलच्या सामानाचे दुकान होते. प्रथम ट्रिपला, किमचा मुलगा पुहांगला (सेडल वेस्ट कोस्टला तर पुहांग वेस्ट कोस्टलाच) आहे. तिथे बऱ्याच स्टीलमिल्स आहेत. तिथे स्पेरिकल रोलर बेअरिंग खूप प्रमाणात वापरतात. पुहांगला किमचा छोटा भाऊ काम बघतो. आम्ही त्याच्या ऑफिसमध्ये पोहोचलो आणि मला समजले की तो रोटरी क्लबचा मेंबर आहे. जेव्हा मी पण रोटरीयन आहे असे त्याला समजले तेव्हा त्याने पुतण्याला सांगितले की, ''आता तू जा. व्ही नो इच अदर व्हेरी वेल, लँग्वेज मे नॉट बी ए प्रॉब्लेम.''

दुसऱ्यावेळी माझ्याबरोबर श्री. गोगटे होते. आम्ही त्यांच्यासाठी डेव्हलप केलेली बेअरिंग जवळजवळ ८० टक्केपेक्षा जास्त चालत होती. आता आम्ही पुढील वर्षासाठी ऑर्डर घेण्यासाठी आलो होतो. आम्ही जाऊन बसताच १० मिनिटांत एक चायनीज माणूस आला. मिल मॅनेजरनी आम्हाला त्याची ओळख करून दिली की तो डिलक्स बेअरिंगचा नवा एजंट आहे. आम्हाला याची काहीच कल्पना नव्हती. त्यांनी त्याला मिळालेले डिलक्स बेअरिंगचे (कीर्तीभाईंच्या सहीचे) लेटर दाखविले व आम्हाला विचारतो की, ''तुमच्याकडे असे लेटर आहे का?'' आमची अवस्था तोंडात मारल्यासारखी झाली होती. किम तर उखडलाच. म्हणाला, ''आम्ही गेली दहा वर्षे तुमचे एजंट असताना कीर्तीभाईंनी असे लेटर कसे दिले?'' तो काहीच ऐकायला तयार नव्हता. आम्ही कीर्तीभाईला फोन लावून सर्व सांगितल्यावर त्यांनी घातलेल्या घोळाची त्यांना कल्पना आली. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे ती एजन्सी फक्त इतर मिलमध्ये जाण्यासाठी होती. नंतर सबंध वाटभर किम काहीच बोलला नाही. शेवटी आम्ही कीर्तीभाईंना माफीचे लेटर धाडायला सांगितले व दुसऱ्या दिवशी आम्ही परत निघालो.

***क्रमश:***




**तृप्ती सुरेश मराठे,** (सुरेश वामन मराठे, ठाणे यांची मुलगी) D.Y. Patil नेरुळ इथून Bachelor in Physiotherapy (515 out of 800) उत्तीर्ण झाली आणि Doctor झाली.

**मराठे परिवाराकडून खूप खूप अभिनंदन!**

# व्रतस्थ

• राधा श्रीकांत मराठे (पृ.३७८), पुणे

इनामदारांचा बंगला रोषणाईने नुसता झगमगत होता. पाचशे बंगल्यांच्या त्या कॉलनीत ज्याच्या त्याच्या तोंडी या रोषणाईचाच विषय होता. त्यांच्या एकुलत्या एका नातवाची–राजीवची मुंज दोन दिवसांवर आली होती. बंगल्याच्या आवारात दिमाखदार मांडव घातला होता. पाहुण्यांच्या स्वागताची जय्यत तयारी सुरू होती. कॅटरर्स, मांडववाले, इतर सेवा पुरवणारे सगळ्यांची ये–जा सुरू होती. इनामदारांचे विश्वासू कारकून, कर्मचारी जातीने सगळ्या व्यवस्थेवर लक्ष ठेवत होते. सोनार, नामांकित विणकर आपल्याजवळचे खास राखीव नग घेऊन बंगल्यावर खेटे घालत होते. विचारपूर्वक, चोखंदळपणे खरेदी होत होती.

या सगळ्यात मुंज मुलाची आई, इनामदारांची सून–अरुंधती मात्र अलिप्त होती. राजीवचे बाबा–श्रीरंगही गप्प होता. त्याची आई, आत्या आणि वडील जे ठरवत होते, ते मुकाट्याने मान्य करत होता. अरुंधतीचा अलिप्तपणा त्याला काट्यासारखा टोचत होता, पण तो हतबल होता. तिला काही सांगू शकत नव्हता. मुंजीचे देवक ठेवण्याचे गुरुजी ठरवून गेले आणि श्रीरंगच्या आई उंची पैठणी आणि दागिन्यांची पेटी घेऊन श्रीरंगच्या खोलीत आल्या.

''सूनबाई, ही पैठणी आणि हे दागिने उद्या घालायचे आहेत देवक ठेवताना.'' त्यांच्या आवाजात जरब होती. पण अरुंधती जराही विचलित झाली नाही. तिने शांतपणे, एक शब्दही न बोलता ते बोचकं उचलून परत त्यांच्या हातात दिलं. त्यांचा चेहरा संतापाने वाकडा झाला. ''अजून ताठा गेला नाही तुझा? मुकाट मी सांगते ते ऐक. श्रीरंग, तू कसा काही बोलत नाहीस तिला? तुला चालतं कसं हे असं दरिद्री राहणं?''

''आई, मी तुला किती वेळा सांगितलंय, मला यात ओढू नको. तुम्ही काय ते सोडवा. मी तिला काहीही म्हणणार नाही.''

संतापाने फणफणत त्या निघून गेल्या. पाच मिनिटांनी श्रीरंगचे आबा स्वत: वर आले. श्रीरंग आणि अरुंधती एकदम चमकले. ते सहसा कधी वर येत नसत. डोळे पुसून अरुंधती खाली मान घालून अदबीने उभी राहिली. ते सोफ्यावर टेकले. किंचित खाकरून घसा साफ केला. ''सूनबाई, गेली १० वर्षं तुम्ही साधी पातळं नेसता, मंगळसूत्र आणि माहेरच्या बांगड्यांखेरीज दागिना अंगाला लावत नाही. अगदी दिवाळीसारख्या सणाच्या दिवशीसुद्धा तुम्ही अशाच राहता. आम्ही कधी काही बोललो नाही. राजीवच्या आजीने कितीही तक्रारी केल्या तरी आम्ही त्यांच्याकडे दुर्लक्ष केलं. पण आता आपल्या राजीवची मुंज आहे, लेकाच्या मुंजीत लक्ष्मीसारखं मिरवावं असं नाही का वाटत तुम्हाला? घरची लक्ष्मी अशी लंकेची पार्वती होऊन राहिली तर आम्हाला तरी बरं वाटेल का सांगा बरं. आम्ही नेहमीच तुमच्या सूनपणाचा मान ठेवला आहे. तुमचा कमीपणा होईल असं कधी वागलो नाही. श्रीरंगच्या आईची कुचंबणाही तुम्ही लक्षात घ्या. त्यांनाही आवडत नाही हे, पण घरची कर्ती स्त्री म्हणून काही बंधनं पाळावी लागतात त्यांना.'' अरुंधतीचं मौन त्यांना ऐकू आलं. त्यातला भावही कळला. हताशपणे ते निघून गेले.

श्रीरंग अरुंधतीजवळ गेला. तिच्या खांद्याभोवती हात वेढून म्हणाला, ''मी समजू शकतो तुझी वेदना. मी कधी काही म्हटलंय का तुला? पण अरू, कधी नव्हे ते आबा आज तुला काहीतरी सांगायला आले, त्यांचा शब्द तरी मान ना. त्यांच्यासाठी, माझ्यासाठी.'' न बोलता अरुंधती त्याच्या खांद्यावर डोकं टेकून उभी राहिली. तिच्या अश्रूंनी त्याचा खांदा भिजला. तिला अलगद पलंगावर निजवून झोप लागेपर्यंत तो तिला थोपटत राहिला. दहा वर्षांपूर्वीच्या त्या घटना त्याच्या डोळ्यासमोर आत्ता घडाव्यात तशा उभ्या राहिल्या.

त्याच्या आत्याची इच्छा होती की तिची पुतणी श्रीरंगाला करून घ्यावी. पत्रिका जुळल्या होत्या, पण श्रीरंगाला त्याच्या मित्राची बहीण अरुंधती आवडली होती. त्यांच्याइतके तालेवार नसले तरी तिचे बाबा मोठे सरकारी अधिकारी होते. अरुंधती कुणालाही आवडेल अशीच होती. ऋजू बोलणं, संस्कारी वागणं. श्रीरंगाच्या आई–वडिलांनी कसलीही खळखळ न करता पत्रिका जुळतायत हे कळल्यावर तिला सून करून घ्यायला मान्यता दिली होती. आत्याने केलेल्या त्राग्याकडे, थयथयाटाकडे त्यांनी दुर्लक्ष केलं. कार्य अगदी झोकात पार पडलं. अरुंधतीच्या आईबाबांनी सगळ्यांचे यथायोग्य मानपान केले. लग्नाच्या दुसऱ्या दिवशी कुलाचार पार पडल्यावर दुपारी अरुंधतीने सगळे दागिने काढून सासूबाईंजवळ दिले. ते आत्याबाईंनी तिच्यासमोरच नीट मोजून घेतले. ''अगं बाई, वहिनी, ती हिऱ्याची अंगठी नाही दिसत कुठे

यात?'' अंगठीची शोधाशोध सुरू झाली. आणि आत्याबाईंच्या तोंडाचा पट्टा सुरू झाला. ''तरी सांगत होते, दरिद्री घरची मुलगी करू नका. पण आमचं ऐकतंय कोण? नेली असेल तिच्या आईने नाहीतर धाकट्या बहिणीने. त्यांना काय ...'' थांबायचं नाव घेत नव्हत्या त्या. बंगल्यातली नोकरमाणसं दाराआड उभी राहून ऐकत होती, एकमेकांना खुणा करत होती. अरुंधती तर इतकी भेदरली होती की 'धरणी पोटात घेईल तर बरं' असं झालं तिला. आपल्या माणसांवर इतका घाणेरडा संशय घेतलेला ऐकून एकीकडे संताप येत होता आणि एकीकडे अंगठी कुठे ठेवली ते आठवत नव्हतं. तासभर तमाशा चालू होता. अखेर आबांनी आवाज चढवला आणि आत्याबाईंचं तोंड बंद झालं. जरा वेळाने सासूबाई पूजेची उपकरणं आवरायला गेल्या तो आरतीच्या तबकात अंगठी दिसली. त्यांना नवल वाटलं. चार वेळा त्या स्वत: देवघरात डोकावून गेल्या होत्या. अंगठी दिसली कशी नाही? पुन्हा आत्याबाईंना जोर चढला. ''बघितलीत हुशारी? तिनेच ठेवली असेल लपवून आणि चोरी पकडली गेली म्हटल्यावर गुपचूप आणून ठेवली असेल...'' श्रीरंगला हे सगळं कळलं तेव्हा तो अरुंधतीला इतकंच म्हणाला, ''माझा आत्यावर मुळीच विश्वास नाही. तू शांत रहा.'' पण तरी अरुंधती चोरासारखी माजघराच्या कोपऱ्यात उभी राहिली.

आता धीर करून दिगंबरअण्णा पुढे झाले. ते गेली पन्नास वर्षं काम करत होते इनामदारांकडे. मान कापली तरी बेईमान होणारा माणूस नव्हता तो. हात जोडून ते आबांसमोर उभे राहिले. ''मालक, लहान तोंडी मोठा घास घेतोय, वाटलं तर हाकलून द्या. पण धाकट्या मालकीणबाईंवर आळ घेऊ नका. त्यांनी थोरल्या मालकीणबाईंना दागिन्यांची पेटी दिली तेव्हा त्यातून अंगठी काढून घेताना मी आत्याबाईंना पाहिलं होतं. मी लक्ष ठेवलं. नंतर त्यांनीच देवघरात जाऊन आरतीच्या तबकात अंगठी ठेवली हेही मी पाहिलं. त्यांची पुतणी करून घेतली नाही म्हणून...''

आबांचा चेहरा काळा ठिक्कर पडला. आपली तालेवार बहीण केवळ आपल्या सुनेला चोर ठरवण्यासाठी असलं नीच कृत्य करेल हे त्यांना अनपेक्षित होतं. आत्याबाईंनी गळा काढला. डोकं आपटून घ्यायला लागल्या. श्रीरंग पुढे होऊन काही बोलणार तो त्याच्या आईने त्याला थोपवला. न बोलता ओटीचं सामान आणलं, नणंदेची ओटी भरली आणि कारकुनाला त्यांना घरी पोचवून यायला सांगितलं. त्यांच्या मते त्यांनी प्रकरण मिटवलं होतं. पण अरुंधती धुमसत राहिली. तिच्या आणि तिच्या माहेरच्या माणसांच्या झालेल्या अपमानाबद्दल कुणी चकार शब्दाने बोललं नाही. श्रीरंगाने वारंवार तिची आणि तिच्या आईवडिलांची माफी मागितली, पण अरुंधती शांत होईना. तिने आपल्या पद्धतीने आपला संताप व्यक्त केला. माहेरून घातलेल्या चार सोन्याच्या बांगड्या आणि मंगळसूत्र याखेरीज कोणता दागिना तिने अंगाला लावला नाही. भारी, भारी साड्या कपाटात पडून होत्या, पण श्रीरंगने तिच्या पसंतीने घेतलेल्या साड्याच ती नेसत होती. भारी साड्या, दागिने माझ्या दृष्टीने कवडीमोलाचे आहेत हे दाखवत होती. श्रीरंगच्या आईने खूप त्रागा केला, पहिल्या दिवाळीला सुद्धा ती त्यांच्या त्राग्याला बधली नाही. राजीव आणि सायलीच्या बारशाला तर आलेल्या बायका तोंडावर म्हणाल्या, ''हे काय, इनामदारांची सून अशी लंकेची पार्वती?'' पण तिच्यावर काहीही परिणाम झाला नाही. तिने कधी याची वाच्यता केली नाही, घरात सहज वावरत राहिली. तिचं हे असं निरलंकृत राहणं हळूहळू सगळ्यांना सवयीचं झालं. पण श्रीरंगाचे आई-आबा खंतावत राहिले. आणि आता नातवाच्या मुंजीतही ती अशीच वावरणार या कल्पनेने ते पुरते खचले होते.

दुसऱ्या दिवशी सकाळी तिचे आई-बाबा आलेले पाहून ती चकित झाली. चहा बाहेर पाठवून ती कामात गुंतून राहिली. पण बाहेर बोलावल्याचा सांगावा घेऊन नोकर आला, तेव्हा तिला जावं लागलं. बैठकीत आबा, सासूबाई, आत्याबाई सगळी हजर होती.

''लग्नाच्या वेळी तुमच्या मुलीची माझ्या बहिणीकडून फार मोठी, अक्षम्य आगळीक झाली आहे. त्याची शिक्षा गेली दहा वर्षं आम्ही सोसतोच आहोत. पण आता नातवाच्या मुंजीत आमच्या घरची लक्ष्मी अशी अलंकारविहीन राहावी हे आम्हाला सोसणार नाही. आम्ही उभयता सर्वांसमक्ष आपल्या मुलीची आणि आपलीही क्षमा मागतो. आपण मोठ्या मनाने आम्हाला क्षमा करा आणि आपल्या मुलीला समजवा की आता राग सोड. मुंजीसाठी घेतलेली पैठणी आणि दागिने स्वीकार. खरी लक्ष्मी दिसू दे ती.''

श्रीरंगचे आई-आबा हात जोडून उभे राहिलेले बघून अरुंधतीचे आई-बाबा एकदम गडबडले. आत्याबाई हबकल्या. अरुंधतीचे वडील झटकन पुढे आले. ''हे काय करता? ऐकेल ती तुमचं. मी शब्द देतो तुम्हाला.'' आता आत्याबाईंना पर्याय उरला नाही. क्षीण शब्दात त्या म्हणाल्या, ''चुकलंच माझं.''

सासूबाईंनी पुढे केलेली पैठणी आणि दागिन्यांची पेटी अरुंधतीने घेतली आणि ती वर गेली. तयार होते तो श्रीरंग वर आला. त्याच्या कौतुकभरल्या डोळ्यांत पडलेलं आपलं देखणं प्रतिबिंब पाहून ती हळूच हसली आणि जिन्याच्या पायऱ्या उतरायला लागली. ♦

# आनंदी आनंद गडे

अशाच एका निवांत सांजसमयीला
असंख्य आठवणी तृप्त मनी गुंजत राहिल्या
खूप काही कमविले, अगदी थोडेच गमविले
आनंदाने सरळसोप गणित सोडवित बसले ।।१।।

पनवेलचे निर्मल, अल्लड बालपण ह्रदयी ठसले
एस.पी. कॉलेज हॉस्टेलचे मयुरपंखी दिन तरळले
नंतर M.Sc. करताना पुणे विद्यापीठाशी नाते जुळले
पुढे विवाहानंतर मुंबईच्या धावपळीशी जुळवून घेतले ।।२।।

V.R.S. घेऊन पुण्यनगरीच्या पाषाण पंचवटीत आले
अन् येथील निसर्गरम्य वातावरणात रमून गेले
कधीच नाही कळत सूर्योदय व सूर्यास्त कधी होतो
कारण भगवद्गीता, दासबोध,
स्वाध्यायमध्ये सर्वजणी गुंग होतो ।।३।।

अगदी प्रत्येक वळणावर सख्या भेटतात जिव्हाळ्याच्या
घट्ट मैत्री जमून जाते सुरांशी समविचारांच्या
गोकुळ व ऋतुराज वाचनालयात मन तल्लीन होते
नवचैतन्य हास्य मंडळातून भरभरून ऊर्जा मिळते ।।४।।

आगे भी जाने ना तू।
पीछे भी जाने ना तू।
जो भी है, बस यही एक पल है।
कवी साहिर लुधियानवी का भी यह जीवनसार है। ।।५।।

म्हणूनच रेखाटले चित्र जीवनावरी
शेवटल्या श्वासापर्यंत फक्त रामनाम यावे ओठावरी
शंभर सुखाच्या धाग्यांना केला स्पर्श हळुवार
किती म्हणून मानावे कृपाळू ईश्वराचे आभार? ।।६।।

**– कवयित्री : श्यामला पुरंदरे, पुणे**
भ्रमणध्वनी : ९४०५८ ४५९८४

# हसरे हितगुज



**पर्याय –**

इंजिनीयरिंग कॉलेजमध्ये शिकत असलेल्या बबलूची आई बबलूच्या वडिलांना म्हणाली, ''आपला बबलू हल्ली फारच खर्चिक झालाय. फार पैसे लागतात त्याला. आणि कुठेही लपवून ठेवले तरी बरोबर हुडकून काढतो हो!''

''त्या गाढवाच्या अभ्यासाच्या पुस्तकात लपवून ठेव तू पैसे. सहा महिने तरी त्याला पत्ता लागायचा नाही.'' वडिलांनी पर्याय सांगितला.



**तेच वापरतो**

वसतिगृहाच्या एका खोलीचं दार एका विक्रेत्यानं ठोठावलं. आतल्या कॉलेजकुमाराला विचारलं, 'साहेब, आपण केसांसाठी कोणतं तेल वापरता?'

तो पोरगा म्हणाला, 'सचिनचं'.

'बरं, मग पावडर कोणती वापरता?'

'सचिनची'

'असं? – पण मी तर या कंपनीचं नाव कुठं ऐकलं नाही...'

'कंपनी नव्हे; माझा खोलीतला मित्र आहे तो!' पोरानं खुलासा केला.

## 'हितगुज'ला जाहिराती द्याव्यात

अभिनंदन, अभिष्टचिंतन, पुण्यतिथी, पुण्यस्मरण, साठावा वाढदिवस, अमृत महोत्सव, सहस्त्रचंद्रदर्शन या निमित्ताने किंवा आपल्या उद्योगव्यवसायाच्या जाहिराती देऊन 'हितगुज'ला आर्थिक सहकार्य करावे.

पाव पान रु.600/-, अर्धे पान रु.1200/-, पूर्ण पान रु.2500/- रक्कम 'मराठे प्रतिष्ठान' नावाने संपादिकेच्या पत्त्यावर चेकने पाठवावी. किंवा IDBI बँक दादर (पश्चिम) शाखेतील बचत क्र. 0501104000043519 मध्ये रोख किंवा चेकने भरा. वरील खाते क्र. 16 आकडी असून सुरुवातीचा 0 आकडा लिहावा. अशा रीतीने पैसे भरल्यावर आपले नाव पत्ता, पैसे भरल्याचा दिनांक व कारण, भ्रमणध्वनी, रक्कम आदी माहिती info@marathepratishthan.org या ई-मेलवर कळवावी. म्हणजे पावती पाठविता येऊ शकेल.

# New Locate Housing Technologies

• श्री. परिमल मराठे (पृ. ३४१), विलेपार्ले, मुंबई भ्रमणध्वनी : ८९७५५६७५७४

In modern construction scenario most important part is of cost. Cost analysis, value Enginerring , alternative material and work systems are key words.

Alternative work system or appropriate system of construction is also called as construction methodology.

Construction methodology selection needs following parameters to be analysed

1. Suitability with the purpose and requirements.
2. Availability material and skilled workers
3. Proper desgin knowledge with desgin team and execution team
4. Cost effectiveness in respect of capital cost and operational cost *some time operational cost is more important than capital cost*
5. Requirement of Maintence and frequency of maintenance or corrective action And many more factors are required to be analysed and long term assessment is required to make methodology *proven methodology*

All above needs different skills and people with definite in depth knowledge in their areas.

*When there are multiple options it becomes more critical to choose correct option*

**For building work**

**Type of Structres**

Rcc frame structure, precast structure, post tensioning, mivan type that is with shear wall structure, composite structure (partially steel and partly concrete structure), complete steel structure etc.

This list is big list and there are many areas of construction like this.

Further more important is knowing about requirement of client, in construction and *specifically residential or individual house builder* most of the time cost is the major criteria. In today's scenario there are no of options available to them, recently govt of india has also taken initiative by introducing 6 new low cost housing option , we are always thinking that low cost means low utility and less facilities but it is not case in all these options because they are mainly related with type of structure for low cost housing.

The housing problem in India is huge, with urban housing shortage pegged at 11.2 million dwelling units. In order to reduce the housing shortage, it is necessary that a speedy and affordable housing construction mechanism be devised. For long, Indians have been building either by the brick masonry or random rubble masonry method or by using an RCC framed structure with infill walls. This system of housing construction is time consuming process, with wastages and inherent difficulties of quality control besides air and noise pollution. Further, there is a shortage of conventional building materials also such as sand, bricks and so on. Therefore, there is an urgent need for us to look at alternate and innovative building materials and construction systems.

In the last few decades, several new technologies have been researched. We now use many waste materials for housing

construction. Similarly, there are methods of constructing with completely new materials. Machinery and technologies for construction in a speedy manner are also now available.

However, the awareness of all these alternate & innovative materials, technologies and methods of construction is limited and therefore, their spread has also somehow been restricted The recent initiative of the Ministry of Housing and Urban Affairs (MoHUA) of the Government of India called Global Housing Technology Challenge-India (GHTC-India) has brought this issue into a sharp focus in the year 2019. Through GHTC-India, a large number of new materials and technologies being used in over 30 countries across the world have been identified and will be used for constructing light house projects in six different states in India. Most of these are green, affordable, fast and easy to construct. These six major 'light house projects' will be live laboratories for evaluation, assessment, certification, standardization, skill development leading to adapting and mainstreaming these technologies in India. This disruption is soon going to herald a major housing' revolution in the country.

The Course on Innovative Construction Technologies has been launched as one of the activities under "Construction Technology Year (2019-20)" which was announced by the Hon'ble Prime Minister during Construction Technology India 2019 : Expo-cum-conference under Global Housing Technology Challenge – India on March 2, 2019 at New Delhi.

It is being offered jointly by the School of Planning & Architecture, New Delhi and Building Materials & Technology Promotion Council (BMTPC), Ministry of Housing & Urban Affairs, New Delhi.

The objectives of this course are to:

a) Familiarise the professionals with the latest materials and technologies being used worldwide for housing.
b) Provide an awareness of the state of art of materials and technologies in terms of properties, specifications, performance, design and construction methodologies so that professionals can successfully employ these in their day to day practice.
c) Provide exposure to executed projects where such materials and technologies have been implemented.

1. Formwork system introduction concept and its features design philosophy Gfrp panel system introduction concept construction methodology and case studies
2. Stay in place formwork system. Stay in place formwork construction methodology implementation and case study
3. Precast sandwich panel system introduction concept construction methodology implementation and case studies
4. Steel structure system construction methodology implementation and case studies
5. Light gauge steel frame structure construction methodology, implementation and case studies
6. Prescast concrete building's construction methodology, implementation and cases studies
7. 3 D printing volumetric system methodology, implementation and case studies.

♦

# शतक वर्ष श्री विक्रम फार्मसीचे

• रघुवीर मराठे (पृ. ४२२), बडोदे भ्रमणध्वनी : ९८७९१८१८३३

**श**तक वर्ष श्री विक्रम फार्मसीचे शतक महोत्सवी वर्ष सुरू होणार १९-०९-२०२१ ते ०९-०९-२०२२.

नमस्कार मंडळी. आज मला सांगायला इतका आनंद होत आहे वरील निर्दिष्टलेलं वर्ष हे 'विक्रम फार्मसी'साठी शतक महोत्सव ठरणार आहे.

बघता बघता एवढी वर्षे कशी निघून गेली हे कळलंच नाही. हे भाग्य आमच्या सर्व कुटुंबीयांसाठी महत्त्वाचं होणार आहे, मनामध्ये भरपूर कार्यक्रम द्यायची इच्छा आहे. पण ही दोन तीन वर्षे कोविडमुळे सांभाळायला हवीत. एकदा का सगळं सुरळीत झालं की आम्ही नक्कीच ते देऊ, ह्या शंभर वर्षांत प्रगती कशी झाली त्याचा एक आढावा द्यायला हवा म्हणून हा सगळा प्रयत्न आहे.

विक्रम फार्मसीचा थोडक्यात इतिहास. 'मराठे' म्हटले की कुठेही जाऊन आपला ठसा उमटवतात ह्या उक्तीप्रमाणे एक लहान मुलगा वडिलांनी पुढे शिकायला नकार दिला म्हणून डोक्यात राग घालून पुढील जीवनाच्या वाटचालीसाठी हातात एक गडू (तांब्या) व सतरंजी घेऊन सावंतवाडीहून निघून थेट मुंबईत हजर झाला.

संपूर्ण नाव विष्णू कृष्ण मराठे. कै. विष्णुपंत मराठे, सावंतवाडी निवासी महादेव मराठे. त्यांचे चिरंजीव कृष्णराव मराठे. त्यांचे चिरंजीव कै. विष्णू कृष्ण मराठे म्हणजे आमचे वडील. जन्म २९ जून १८९२ सावंतवाडी येथे झाला. थोडीशी शेती. शिकण्याची भरपूर आवड होती. तिसरीपर्यंत शिक्षण झाले त्यावेळेस शिकायला शाळेत जाण्यासाठी दोन डोंगर पार करून जावे लागे. पुढे शिकायची इच्छा असूनही परिस्थितीमुळे त्यांच्या वडिलांनी नकार दिला. स्वभाव थोडासा तामसी असल्याने डोक्यात राग घालून घेतला व एक सतरंजी व तांब्या (लोटा) घेऊन घरातून बाहेर पडले. बोटीने प्रवास करून मुंबईत उतरले. त्यावेळेस चाकरमान्यांसाठी मुंबई हे एकच स्थान असल्यामुळे तेथून त्यांच्या सत्त्व परीक्षेची सुरुवात झाली.

लहानपणीच वडील वारल्याने मागे परत फिरण्याची वाटच बंद होती. त्यांचे एक नातेवाईक गिरगावात रहात होते. पण त्यांची परिस्थिती सुद्धा बेताचीच होती, गिरगावातील जुन्यांत जुने औषधाचे दुकान 'माधव एजन्सी' होते. वडिलांची अशी परिस्थिती बघून त्यांना दुकानात नोकरी दिली. दुकान औषधांचे असल्यामुळे तिथे त्यांना भरपूर शिकायला मिळाले. दुकान बंद झाले की बाहेर दुकानाच्या ओट्यावर झोपायचे व माधवाश्रमात जेवायचे. माधव एजन्सीतील अनुभवावरून व चिकाटीच्या जोरावर त्यांना 'अलेम्बिक' ह्या पार्टनरशिप असलेल्या औषध बनवण्याच्या दुकानात नोकरी मिळाली. माधव एजन्सीतील अनुभवाचा इथे त्यांना पुष्कळ फायदा झाला.

ह्या अलेम्बिकमध्ये तीन भागीदार एक श्री. कोटीभास्कर, दुसरे श्री. के. टी. गज्जर व तिसरे श्री. भाईलालभाई अमीन. श्री. कोटीभास्कराच्या सान्निध्यात त्यांना बरेच शिकायला मिळाले. ही फर्म त्यावेळेस लोअर परेल येथे होती. वास्तव्य गिरगावात व नोकरी लोअर परेल येथे. पुढे नेहमीप्रमाणे भागीदारांमध्ये नेहमी घडतं तसं व्हायला सुरुवात झाली. त्या अवधीत श्रीमंत सयाजीरावांनी भाईलालभाईंना बडोद्याला येण्याचे आमंत्रण दिले. तोपर्यंत पार्टनरशिपमधून कंपनीमध्ये त्याचे रूपांतर झाले होते व बडोद्यात आल्यास आपल्याला आम्ही जमीन देऊ. पण माझ्या राज्यात औषधाची कंपनी पाहिजे असे ते म्हणाले... गुजराथी माणूस जमीन मोफत मिळाल्यामुळे लगेचच तयार झाले. वडिलांनी सांगितलेला संवाद. भाईलालभाईंनी सांगितले, ''आपण बडोद्याला जात आहोत.'' त्यावर वडील म्हणाले, ''तुम्ही जाल तिथे मी आनंदाने येईन.'' भाईलालभाई वडिलांचे गुण ओळखून होते. 'गोल्ड क्लोराईड' बनवण्यात (जे काचेच्या बल्बमध्ये फुंकून भरावे लागते) त्यांचा हातखंडा होता. ते जाणून होते. पहिली नोकरी म्हणून त्यांचं भाईलालभाईंवर प्रेम होतं. एखाद्याची नाळ जुळते तसे झाले होते. भाईलालभाईंनी कधीही नोकरासारखी वागणूक दिली नाही. सौ. भाईलालभाई म्हणजे चंचळबानी बडोद्याला एखादे औषधाचे दुकान चालू करण्याचा सल्ला दिला. त्या आधी 'एन. फडके अँड कं.'मध्ये अनुभव घेतला. नंतर कै.सोनोपंत दांडेकर (मामा दांडेकर) ज्ञानेश्वरीचे गाढे विद्वान ह्यांच्या बहिणीचे यजमान कै. फडके ह्यांनी स्वखुशीने आर्थिक मदत केली व १९२२ मध्ये अनंत चतुर्दशीच्या शुभमुहूर्तावर 'विक्रम फार्मसी' व 'मराठे ब्रदर्स' अशी दुकाने उघडली. फार्मसीमध्ये औषधे बनवली जायची व मराठे ब्रदर्समध्ये विकली जायची. त्याबरोबर अलेम्बिकची नोकरी करून हे सगळं सांभाळलं जायचं. दुकानाच्या भरभराटीमुळे त्यांची औषधाच्या मालाच्या सप्लायसाठी गायकवाड स्टेटकडून

नेमणूक झाली होती. ती उद्घोषणा दुकानाच्या बोर्डावर लिहिली गेली होती. ''By Special Appointment From H.H Maharaja Gaekwaad OF BARODA'' इंग्लिश बोलणारी बरीच गिऱ्हाइके येत असल्यामुळे व सावंतवाडीचे प्रेम असल्यामुळे तेथील श्री. सबनीस ह्यांना भागीदार केले. ही सबनीस मंडळी म्हणजे गरुडेश्वरच्या महाराजांनी ट्रस्टी म्हणून ज्यांची नेमणूक केली होती, त्यांचे चिरंजीव. पुढे अलेम्बिकची एजन्सी मिळाली व त्याचे 'बरोडा अलेम्बिक डेपो'च्या नावाने अलेम्बिकच्या मालाची विक्री तेथून सबंध बडोद्यासाठी होऊ लागली. त्यांनी मुंबईला, पुण्याला शाखा उघडल्या व त्यांच्या मनांतून बेळगावला सुद्धा शाखा उघडायची होती व तिथेच पार्टनर्समध्ये वाद सुरू झाले.

त्यांचे एक भाऊ औषधाचाच व्यापार सावंतवाडीत करत असत पण तिथे बरोबर बस्तान न बसल्यामुळं ते बडोद्यात परत आले व 'मराठे ब्रदर्स' असं सुरू केलं होतं. काही वर्षे ते इथे होते पण नंतर निवर्तले. आम्ही नेहमी विचारात असू की विक्रम कुणाचं नाव नसताना तुम्ही हे नाव दुकानाला कसं दिलं त्यावर त्यांनी खुलासा केला की, ''माझ्या नावाची पहिली तीन अक्षर घेतली आहेत'' त्यांचे संपूर्ण नाव विष्णू कृष्ण मराठे.

'विक्रम फार्मसी'मध्ये अनेक प्रॉडक्ट्स तयार होत असत. अजिबात शिक्षण नसताना देखील केवळ हिम्मत आणि चांगलं हेरण्याच्या बुद्धिमत्तेने त्यांनी मुलींच्या नावाने लीला टूथ पावडर, कुसुम टाल्कम पावडर व इंदू स्नो त्याचबरोबर ॲलोपॅथिक औषध 'विक्रम' लॅक्सेटिव्ह टॅब्लेट्स, विंटोरब हिरवा कडक बाम व गम स्टिम्यूलंट दातांसाठी अशी बरीच औषधे बनवीत, पुढे पुढे सरकारी नियंत्रणामुळे हे सर्व बंद केलं पण त्यातील 'कोकम पोमेड' हे त्यांचे आवडीचं प्रॉडक्ट होते ज्याच्या मागे एक इतिहास आहे. म्हणजे त्यांचे वडील कोकमाच्या झाडावरून पडल्यामुळे त्याबद्दल आत्मीयता खूप होती. तेवढेच चालू ठेवले. हा सर्व खटाटोप त्यांच्या हाताखाली असलेल्या चांगल्या माणसांच्यामुळे होऊ शकला. जेव्हा भागीदारी सुटली तेव्हा त्यांत प्रामुख्याने श्री. गाडे तात्या, भाऊराव आपटे, गोपाळराव परांजपे, भैया, नारायण ही मंडळी मराठे ब्रदर्समध्ये गेली. मोठं दुकान म्हणून पण शांताराम नारायण जोशी, शंकरराव खानविलकर हे दोघेही विक्रम फार्मसीमध्येच थांबली. ह्यातील बऱ्याच जणांना मी स्वतः बघितलं आहे. त्यावेळेस ह्या सगळ्यांची लग्नेही झाली नव्हती. वडिलांनी प्रत्येकाचा संसार सुरेख थाटून दिला. त्यांत गोपाळराव परांजप्यांनी पुढे 'परांजपे ब्रदर्स' असे दुकान दांडिया बाजारमध्ये सुरू केले.

पूर्वी बडोद्यात बेंगाल केमिकल्सची टिंक्चर्स भरपूर खपायची व डॉ. मंडळी तीच वापरत असत. अलेम्बिकची टिंक्चर्स चांगली असून डॉ. वापरत नसत. ही मालकांची अडचण वडिलांच्या लक्षात आली. त्यांनी मालकांना एक सूचना केली की श्रीमंत सयाजीराव महाराजांना अतिथी प्रमुख करून सर्व डॉक्टर्सना आमंत्रण घ्यायची आणि आपली प्रॉडक्ट्स सांगायची. त्यांनी तसे घडवून आणले. त्याचा परिणाम इतका सुंदर झाला की टिंक्चर्स खपायला लागली. मालकांनी खूश होऊन त्याकाळी रु.१००१ रोख बक्षीस दिले. तीच रक्कम वडिलांनी 'केमिस्ट असोसिएशन' ह्या त्यांनीच निर्माण केलेल्या संस्थेला दिले. ह्या संस्थेचे ते स्थापक होते व काही काळ अध्यक्ष पण.

त्यांचा अलेम्बिकमधील कार्यकाळ जवळजवळ ५० वर्षांचा होता. अजूनपर्यंत तो रेकॉर्ड कुणीही मोडला नाही. 'अलेम्बिक जगत' ह्या पत्रिकेत त्याचा विशेष अहवाल छापला होता. पुढे मराठे ब्रदर्समध्ये भागीदारांत वर उल्लेख केल्याप्रमाणे मतभेद निर्माण झाल्याने संबंध न बिघडवता त्यांनी मराठे ब्रदर्स श्री. सबनीसांना सोपवले व विक्रम फार्मसी आपल्याकडे ठेवली. हे सर्व १९४७ च्या सुमारास घडले. त्याच वेळेस त्यांच्या मोठ्या मुलीच्या म्हणजे लीलाच्या (आक्का) लग्नाची बोलणी चालली होती. सहज एखादी घटना सांगावी तसे त्यांनी घरी येऊन सांगितले. बाकीच्यांना धक्काच बसला पण अंगात आत्मविश्वास असल्यामुळे सगळं पुन्हा स्थिरस्थावर केलं. १९४७ ते १९६५ हा काळ अत्यंत कठीण गेला. त्याचवेळेस आमचे मोठे बंधू कै. श्री. बाळासाहेबांनी व जोशीबुवांनी ही धुरा अंगावर घेऊन विक्रम फार्मसीची भरभराट घडवून आणली. पुढे श्री. रघुवीर व मोहनरावांनी हातभार लावून हा आलेख उंचीवर नेला. नंतर नेस्लेची एजन्सी आल्यावर तीन वर्षे ती विक्रम फार्मसीने ती हाताळली व १९८५ मध्ये ती मोहनराव विक्रम एजन्सीच्या नावाने हॅन्डल करत असत. बाबूराव व बाळासाहेब व मोहनरावांच्या पत्नी विक्रम फार्मसीमध्ये भागीदार तर एजन्सीमध्ये मोहनराव, सौ. शालिनी (बाळासाहेबांच्या पत्नी) व सौ. रजनी (बाबूरावांच्या सहधर्मचारिणी) अशी व्यवस्था करण्यात आली. आता चि. दिलीप कै. बाळासाहेबांचा मुलगा व त्याच्या पत्नी सर्व कार्यभार सांभाळतात.

गिऱ्हाइके मराठे कुठे विचारायची मग आम्ही विचारायचो ओरिजिनल मराठे विक्रम फार्मसीत मराठे आडनावांशिवायचे शेजारी बसतात, असं असून सुद्धा आमच्यात कधीही दुःस्वास निर्माण झाला नव्हता. सगळी गिऱ्हाइके शेजारी जायची त्यावेळेस आमचा गल्ला जेमतेम शंभर रु. असायचा.

कै. विष्णुपंतांच्या पत्नीचे नाव कै. आनंदीबाई. नावाप्रमाणेच सगळा संसार केला. त्यांना तीन मुले व तीन मुली. कै. नीला माटे, श्रीमती कमला जोशी व सौ. सुनीती भागवत, मुले कै. बाळासाहेब, श्री. रघुवीर व श्री. मोहनराव आणि सुना



संगीत कार्यक्रम राम मराठे, वसंत आचरेकर, तुलसीदास बोरकर



Amin Ramanbhai Amin Alembic व Dhirajben Amin, Mr. Vishnupant Marathe, Mrs. Anandibai Marathe




कै. शालन, सौ. रजनी आणि सौ. सुषमा.

माट्यांचा परिवार कोल्हापूर, बडोदा व इंदोर येथे आहे, कमलाबाईंचा मुंबईमध्ये आणि सौ. सुनीतीबाईंचा मुंबईत. सगळ्यांची मुलं सुविद्य असून काहीजण कन्सल्टन्सी आणि कॉर्पोरेट सेक्टरमध्ये आहेत. काही दंत चिकित्सक आहेत. सर्व सुना सुविद्य असून त्यांच्या सोशिअल ॲक्टिव्हिटीज चालू असतात. सर्व नातवंड चांगल्या पोस्टवर असून काही चांगल्या उच्च पदावर आहेत.

संगीताची आवड असल्यामुळे त्यांनी 'बडोदा संगीत मंडळ' असं एक मंडळ स्थापलं होतं. त्यांत श्रीमती गंगुबाई हंगल, गजाननबुवा जोशी व माणिक वर्मा, मधुकरराव जोशी, सुरेश हळदणकर, राम मराठे व कुमार गंधर्व अशी बरीच मंडळी आमच्या घरी गाऊन गेली. कुमारांचे तबलावादक कै. वसंतराव आचरेकर हे आमच्या घरातील मोठे भाऊच समजले जायचे. पंचाहत्तरीला राम मराठ्यांचा खास कार्यक्रम ठेवला होता. आणि अजून तो लोकांच्या स्मरणात आहे.

एक किस्सा असा घडला, आमच्या चिरंजीवांकडे म्हणजे अमेरिकन कंपनीने एक औषध बनवून घेण्यासाठी भारतात पाठवले होते व त्यासाठी बिल गेट ह्यांच्याकडून कंपनीला मदत मिळणार होती.

त्या औषधाचं कॉम्बिनेशन दोन मूलभूत द्रव्यांचं होतं. दोन कंपन्यांमध्ये हे कॉन्ट्रक्ट मिळवण्यासाठी चढाओढ लागली होती अलेम्बिकचे आताचे मालक श्री. चिरायूभाई ह्यांचे चिरंजीव बोलणी करण्याकरता आमच्या चिरंजीवांना भेटले. गुजराथी माणसाची जिव्हाळ्याची एक गोष्ट म्हणजे गुजरातचा माणूस भेटणे एक तमे क्याथी भण्या एटले तमे गुजरातना. त्यांना वाटले की करार आपल्याला मिळालाच समजा पण दुसरी कंपनी जी पुण्याची होती. तीसुद्धा त्यांच्याच कंपनीची प्रॉडक्टस बनवत असे. पण दोघांना त्याने एक एक प्रॉडक्टचे इंग्रिडीअंट करायला दिले.

शेवटी चिरायूभाईंच्या चिरंजीवांना सांगितलं की ''कदाचित तुम्हाला माहीत नसेल म्हणून सांगतो की माझ्या आजोबांनी आपल्या कंपनीत ५० वर्षे नोकरी केली आहे.'' त्याला आश्चर्याचा धक्काच बसला. पुढे कंपनीला १०० वर्षे पूर्ण झाली तेव्हा त्याला खास निमंत्रण पाठवले होते.

बाबांच्या 'अमृत महोत्सवा'च्या कार्यक्रमाला त्यावेळचे अलेम्बिकचे अध्यक्ष श्री. रमणभाई व त्यांच्या सुविद्य पत्नी धीरजबेन प्रमुख पाहुणे म्हणून आले होते. त्यांत कै. चिं.गो. जोशी, कै. वसंतराव कप्तान, कै. रामभाऊ जोशी, नेत्र विशारद डॉ. पद्माकर पेंडसे, सौ. सुनीती भागवत व सौ. निरुपा माटे (पारघी) ह्यांची भाषणे झाली. त्यात श्रीमती इंदिराबाई पेठे त्या आमच्या आईच्या खास मैत्रीण ह्यांचं भाषण झाले. आपल्या भाषणात त्या म्हणाल्या की, ''आपलं सर्व लक्ष फडकणाऱ्या ध्वजाकडे जातं पण ज्या काठीवर ध्वज उभारला जातो त्याला ऊन, पाऊस, थंडी हे सर्व सहन करायला लागत'' आमच्या आईने त्यांच्या संसारासाठी सगळं केलं. आणि हे सर्व करताना तिने घरातील वातावरणही बिघडू दिले नाही.

बाबांचं निधन २२ ऑगस्ट १९७९ रोजी झाले. संपूर्ण

औषध बाजार बंद ठेवून त्यांना श्रद्धांजली दिली गेली होती. त्यानंतर विक्रम फार्मसीने १९६७ घाऊक विक्रीचं डिपार्टमेंट वेगळं केलं व ते रघुवीर मराठे बघत असत. त्यांना दिलीप मराठे व सोनाली मराठे मदत करीत असत. त्यात बॉम्बे केमिकल्स (कछुवा अगरबत्ती) पार्क डेविस, बेंगाल केमिकल्स आयुर्वेद संशोधनालय (कैलास जीवन), Caddbury India बायर इंडिया (जंतुनाशक), जिनो फार्मास्युटिकल्स, Rajasons Ayurvedic (Nasik) Solumiks Div, (श्री धूतपापेश्वर लिमिटेड), Frutico Dindayal Aushadhalay (३०३) ओंकार आयर्वेदिक मुंबई Shonaan Products. (पुणे) Moon light Ahmadabad, Jagsonpal Pharmaceuticals, Geno pharmaceuticals (Goa) Lark Lab New Delhi.Ambey. Lab New दिल्ली. Super Stockists = Phyto Pharma पुढे Wholesale Div दिलीप व श्री. बाळासाहेबांना सोपवून.

कोकम पोमेड फक्त बाबूरावांनी त्यांच्याकडे ठेवले. ते आता सबंध गुजरात, महाराष्ट्र व पार्ट ऑफ राजस्थान बघतात. तिसऱ्या पिढीची अशीच भरभराट राहावी, ईश्वरचरणी प्रार्थना. ♦

---

# आपत्तीची अमूल्य संधी

**गु**रूने दिला ज्ञानरूपी वसा, आम्ही चालवू हा पुढे वारसा. या वचनाने भारतीय संस्कृती भारावलेली आहे. श्री गणेशाने देवांवरील संकटे दूर केली त्या गणेशोत्सवात नैसर्गिक, मानसिक संकटे माणसाच्या हात धुऊन मागे लागली.

संकटाला संधी मानलं तर अनेक पर्याय उलगडतात. हेच बघा वृत्तपत्र घरी येऊ लागली व त्याच्या वाचनातून जगाचे फोटोदर्शन घडले. मी याच छापील रंगीत फोटोंच्या आधाराने जलरंगात निसर्ग व प्रसंगचित्रे रंगवली. आजपर्यंत १/८ साइजची ६० चित्र रंगवली. आमच्या मैत्री, शाळा, नातलग, परदेशस्थ खूप ग्रुपवर फोटो पाठवले. त्याच्या प्रतिसादाने मला प्रेरणा मिळाली.

पीडित व वृद्धांसाठी हा आनंद वाटला. कलाक्षेत्रातील मित्रवर्ग, भाचे, पुतणे यांनीही काही सूचना केल्या. अस्मिता, आकाशवाणी मुंबई केंद्र, यांनी मला विचारलं मुलाखत देणार का? विचारल्यावर मी पूर्वतयारीने १० तारखेला ५ मिनिटे 'लॉकडाऊनचा वेळ कसा व्यतीत केला' याविषयी बोलले. माझे कार्यक्षेत्र डोंबिवली, सध्या निवास ठाणे येथेही आम्ही ज्येष्ठ नागरिक संघ तयार करून भजन, वक्तृत्व खेळात मन रमवित आहोत.

मी ३५ वर्षं माध्यमिक मराठी माध्यमात कलाविषय शिकवून आनंद लुटला, आणी आनंदाने निवृत्त झाले. कलानंदाचे डोही आनंद तरंग उठले. माझ्या यशस्वी विद्यार्थ्यांचा वेळ मार्च, एप्रिल, मे मध्ये वाया गेला. विद्यार्थ्यांना फी भरल्याशिवाय निकालपत्र मिळेना. तेव्हा त्यांना यथाशक्ती मदत करून सुस्थिर करणे आवश्यक होते. माजी विद्यार्थी संघटनेला आवाहन केले. एका दिवसात तेवीस विद्यार्थ्यांची फी भरली. असे ताई, दादा ज्या विद्यार्थ्यांना भेटलेत यापेक्षा अधिक काय हवं?

उद्योग, दिग्दर्शन, पत्रकारिता, प्राध्यापक, शिक्षक, कलाकार अशा अनेक क्षेत्रात यशस्वी, नावाजलेल्या त्या मुला मुलींशी गप्पा केल्याने अद्ययावत माहिती व ज्ञानात भर पडते. खरंतर मनुष्य आयुष्यभर विद्यार्थीच असतो नाही का? रसिकता, माणूसकी प्रेम हेच या सर्वांचे गमक आहे. माझी नात आयरा, मानसी यांचे सुश्राव्य गायन, तसेच चित्रप्रूती प्रेरक ठरते. नातू वेद खेळायचे स्वप्न बघतो, मित्र गोतावळा जमवतो, दिवसभरात फक्त आजी लिंबू सरबत दे ना एवढंच माझ्याकडे मागतो. नवे तंत्रज्ञान आत्मसात केल्याने शाळाबाह्य अभ्यास सुरू आहे. घरूनच ऑफिस काम (नो टाइम लिमिट) यामुळे मुले, गृहिणी, नोकरदार, ज्येष्ठ सर्व एकाच छत्राखाली आहेत. हल्ली दुर्मिळ झालेला वेळ कुटुंबासाठी देता येतोय. सर्व वयोगट एकमेकांना समजून सहकार्य करत आहेत.

**लेखिका : कुमुद मराठे/डोके**, *माजी शिक्षिका, ठाणे*




**श्री. मोहन मराठे, (खार) यांची चित्रकला**

**पत्रव्यवहाराचा पत्ता :** संपादिका : डॉ. सौ. सुमेधा मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई – ४०० ०३१
भ्रमणध्वनी : ९८२०२३२०८२ • इ-मेल : **hitguj@marathepratishthan.org** • वेबसाईट : **www.marathepratishthan.org**